# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २५/०१/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक २५/०१/२००६ रोजी सभा सुचना क्र. २४ दि. १९/०१/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ८) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ९) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| १०) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ११) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| १२) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १३) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| १४) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १५) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग, मनपा कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत करतो. आपणां सर्वाकडून सहकार्याची अपेक्षा बाळगतो आणि सभेला सुरुवात करावी अशी सचिवांना सुचना करतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

सचिव साहेब, सभा सुरु होण्यापूर्वी विचारु इच्छितो की, हे नक्की स्थायी समितीचे सदस्य आहेत की परिवहन समितीचे सदस्य आहेत की धर्मशाळा आहे ते प्रथम सांगा.

**केशव घरत :-**

हे सभागृह आहे की धर्मशाळा आहे तेच समजत नाही.

**प्र. सचिव :-**

हे स्थायी समितीचे सभागृह आहे.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, आपल्या स्थायी समितीच्या सभागृहामध्ये फक्त स्थायी समितीची सभा चालवायला पाहिजे. तुम्ही स्थायी समिती सभागृहात परिवहन समिती, वृक्षप्राधिकरण समिती वगैरेसारख्या समितीची सभा घेतली तर खुर्चीचा मान राहत नाही. कारण त्या समितीचे सदस्य निवडून आलेले सदस्य नाहीत. ते सदस्य असेच इकडे येऊन बसले तर खुर्चीचा मान राहत नाही. म्हणून मी या ठिकाणी ठराव मांडतो की, स्थायी समितीच्या सभागृहामध्ये दुस-या कुठल्याही सभा घेऊ नयेत.

**जयंत पाटील :-**

परिवहन समिती किंवा वृक्षप्राधिकरण समितीची सभा स्थायी समितीच्या सभागृहात होत असेल तर तुम्ही त्यांच्याकडून सभागृहाचे भाडे घ्यावे.

**केशव घरत :-**

प्रभाग समित्यांच्या सभासुध्दा या सभागृहात घेणार होते.

**सुर्यकांत भोईर :-**

अशा कुठल्याही सभा घेतल्यामुळे सभागृहाची काहीही व्हॅल्यु राहत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

स्थायी समितीच्या सभागृहात स्थायी समितीच्या सभे व्यतिरिक्त कुठलीही सभा घेऊ नये.

**गजानन भोईर :-**

इतर महापालिकांमध्ये असे चालत नाही.

**केशव घरत :-**

नगरभवनचा हॉल रिकामी आहे. मग ते सभागृह चालू करा. ते सभागृह चालू केल्यामुळे काहीही फरक पडणार नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

नगरभवनला सभागृह आहे. तिथे इतर सर्व मिटींग घ्यायला सुरुवात करा.

**केशव घरत :-**

नगरभवनच्या सभागृहामध्ये सर्व सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे तुम्हाला त्या सभागृहात सभा घ्यायला हरकत नाही असे मला वाटते.

**प्र. सचिव :-**

प्रथम अजेन्ड्याचे वाचन करुया आणि नंतर ह्या विषयाबाबत चर्चा करुया.

**मोहन पाटील :-**

तुम्ही स्थायी समितीचे सभागृह दुसऱ्या समित्यांना मिटींगसाठी न देण्याबाबतचा ठराव मांडू नका.

**जयंत पाटील :-**

मुळात हे सभागृह दुसऱ्या समित्यांना सभेसाठी वापरायला देण्याचे अधिकार कोणाला आहेत?

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब, आज स्थायी समितीची सभा होत आहे. परंतु, या सभेपूर्वी परिवहन सेवा समितीची सभा असल्यामुळे सर्व सन्मा. सदस्यांना बाहेर थांबावे लागलेले होते. ही गोष्ट सभागृहाच्या मानाने योग्य नाही. यासाठी आपल्याला या गोष्टीचा विचार करावा लागेल. यापुढे इतर सभा स्थायी समितीच्या सभागृहात होऊ नयेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, फक्त परिवहन सेवा समितीची सभा न होता वृक्षप्राधिकरण समितीची सभा होते. प्रभाग समितीचीसुध्दा सभा स्थायी समितीच्या सभागृहात होते.

**केशव घरत :-**

या ठिकाणी प्रभाग समितीचीसुध्दा सभा होते.

**एस. ए. खान :-**

सर्व सभा स्थायी समितीच्या सभागृहातच होतात.

**मोहन पाटील :-**

वृक्षप्राधिकरण समितीचे पदसिध्द अधिकारी मा. आयुक्त साहेब आहेत. सध्या वृक्षप्राधिकरण समितीला सभागृह नाही. म्हणून या ठिकाणी वृक्षप्राधिकरण समितीची सभा घ्यायला हरकत नसावी असे मला वाटते.

**प्रेमनाथ पाटील :-**

वृक्षप्राधिकरण समितीच्या सभे व्यतिरिक्त इतर सभा घेण्यात येऊ नयेत.

**जयंत पाटील :-**

परंतु हा एकप्रकारे भेदभाव आहे.

**मोहन पाटील :-**

हा भेदभाव नाही. त्यांची जी समिती आहे, त्या समितीला सभागृहाचे दालन नाही.

**जयंत पाटील :-**

वृक्षप्राधिकरण समितीच्या सभेमध्ये मा. आयुक्त साहेब असल्यामुळे हा भेदभाव केला जात आहे.

**मोहन पाटील :-**

आरोग्य समितीला त्यांचे स्वतःचे कार्यालय आहे. त्यांच्या मा. सभापतींना स्वतःचे दालन आहे. अशा सर्व गोष्टी सर्व समित्यांना उपलब्ध आहेत. महिला व बालकल्याण समितीलासुध्दा स्वतःचे दालन आहे.

**केशव घरत :-**

प्रभाग समितीलासुध्दा कार्यालय आहे.

**मोहन पाटील :-**

या ठिकाणी फक्त वृक्षप्राधिकरण समितीची चर्चा चालू आहे.

**प्र. सचिव :-**

परिवहन सेवा समितीचे मा. सभापती हे त्या समितीचे सदस्य आहेत आणि परिवहन व्यवस्थापक म्हणून मा. आयुक्त साहेबांची नियुक्ती केलेली आहे.

**मोहन पाटील :-**

परंतु, तुम्ही त्याची व्यवस्था करा.

**सुर्यकांत भोईर :-**

नगरभवनमध्ये हॉल आहे किंवा नगरभवनमध्ये जे सभागृह आहे, तुम्ही त्याच्यामध्ये मिटींग घेऊ शकता. नगरभवनमध्ये सभागृह असताना तुम्ही इथे मिटींग का लावता?

**मिलन पाटील :-**

या मिटींगला काय टाईमिंग द्यायचे आणि त्या मिटींगला काय टाईमिंग द्यायचे हे तुमच्या हातात आहे. जर आमच्या समितीची सभा असेल तर तुम्ही त्या समितीच्या सन्मा. सदस्यांना टाईमिंग ॲडजेस्ट करुन द्या. आमची काहीही हरकत नाही.

**केशव घरत :-**

आता तिथे लिफ्टचीसुध्दा व्यवस्था केलेली आहे.

**प्र. सचिव :-**

ती मिटींग वेगळ्या टाईमावर भरलेली होती.

**सुर्यकांत भोईर :-**

आपला भाईंदर पोलिस स्टेशन ते उत्तनच्या रस्त्याचा विषय होता. तसेच, बांधकाम मंत्री श्री. छगनराव भुजबळ साहेब यांच्या दालनात मिटींग असल्यामुळे आपली सभा पुढे ढकलली गेलेली आहे.

**प्रभात पाटील :-**

सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर, तुम्ही बोलता तो विषय या ठिकाणी नाही. स्थायी सभागृह इतर समित्यांना द्यायचे की नाही या विषयावर चर्चा चालू आहे.

**एस. ए. खान :-**

स्थायी समितीची सभा सोडून इतर कुठल्याही समितीची सभा घेण्यासाठी स्थायी समितीचे सभागृह द्यायचे नाही. स्थायी समितीच्या सभागृहाचा वापर स्थायी समितीची सभा घेण्यासाठी करायचा.

**सुर्यकांत भोईर :-**

नगरभवनचा हॉल आहे त्याचा वापर करायचा.

**एस. ए. खान :-**

स्थायी समितीच्या सभागृहाचा स्थायी समितीच्या मिटींगसाठी वापरायचा. दुसऱ्या कुठल्याही सभासाठी स्थायी समितीचे सभागृह वापरायचे नाही असा मी या ठिकाणी ठराव मांडत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, माझ्या मते परिवहन सेवा समितीचे ऑफिस नगरभवनमध्येच आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

जर तुम्ही परिवहन सेवा समितीच्या सभा, या ठिकाणी घेत असाल तर आम्ही प्रभाग समिती क्र. ०४ ची सभासुध्दा स्थायी समितीच्या सभागृहात घेतो.

**मोहन पाटील :-**

स्थायी समितीच्या सभागृहाचा वापर करण्यासाठी ठराव करण्याची आवशक्ता नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

परिवहन सेवा समिती किंवा प्रभाग समिती वगैरेच्या मिटींग नगरभवनच्या हॉलमध्ये घेण्यात याव्यात. कारण तिथे भरपुर जागा आहे. पन्नास लोक बसु शकतात एवढी जागा तिथे उपलब्ध आहे.

**एस. ए. खान :-**

नगरभवनमध्ये इतर सभा घ्यायला हरकत नाही. कारण तिथे पुष्कळ जागा उपलब्ध आहे.

**रतन पाटील :-**

तो हॉल खुप मोठा आहे. भरपुर जागा आहे.

**प्रभात पाटील :-**

जर याच्यापुढे असे होत असेल तर आम्ही आमची मिटींग मा. सभापती साहेबांच्या केबीनमध्ये घेतो. आम्ही तिथेच मिटींग घेऊन निघुन जाऊ. आम्ही इथे येणार नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

याबाबत मा. आयुक्त साहेबांनी रुलिंग द्यावे.

**एस. ए. खान :-**

याबाबत मा. आयुक्त साहेबांनी रुलिंग द्यावे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही वृक्षप्राधिकरण समितीचे अध्यक्ष आहात. तुमची काय भुमिका आहे ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

स्थायी समितीच्या सभागृहाबाबत सन्मा. सदस्यांनी या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यांचा प्रश्न हे सभागृह इतर समित्यांना वापरायला द्यायचे की नाही याबाबत आहे. मी या संदर्भात असा खुलासा करतो की, आज स्थायी समितीची जी सभा होती. ही स्थायी समितीची सभा सुरु होण्याची वेळ सकाळी ११.०० वाजाता होती. परंतु, काल संध्याकाळी मा. बांधकाम मंत्री श्री. छगन भुजबळ साहेबांच्या कार्यालयातुन फॅक्स आला. त्यांनी दुपारी १२.०० वाजता उत्तनचा रस्ता ताब्यात घेण्याबाबत मिटींग लावलेली होती. त्या मिटींगला जाणे अत्यंत आवश्यक होते. म्हणूण मी स्थायी समितीच्या मा. सभापतींना विनंती केली की, सकाळी ११.०० वाजता होणारी स्थायी समितीची सभा संध्याकाळी घेण्यात यावी. मी स्थायी समितीच्या सभापतींना पर्सनल रिक्वेस्ट केलेली होती.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

परंतु, आपला प्रश्न असा आहे की, आपण स्थायी समितीच्या सभागृहात कुठल्या समितीला सभा घ्यायला परमिशन द्यायची ते सांगा?

**मा. आयुक्त :-**

मला या ठिकाणी येऊन चार-पाच महिने झाले. परंतु, मला या चार-पाच महिन्यामध्ये दुहेरी सभा झाल्याचे आढळून आलेले नाही. म्हणजे सकाळी एक सभा होते आणि संध्याकाळी एक सभा होते असे मला आढळून आलेले नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

परंतु, याबाबत तुमचे काय मत आहे ते सांगा?

**जयंत पाटील :-**

तुम्ही अशा दुहेरी सभा घेऊ नयेत असे आमचे मत आहे.

**मा. आयुक्त :-**

ज्या-ज्या समित्या किंवा जे-जे विभाग आहेत, ते सर्व महापालिकेचे म्हणजे आपलेच विभाग आहेत. ते विभाग आपल्यापेक्षा वेगळे आहेत अशातला भाग नाही. परिवहन सेवा समिती किंवा वृक्षप्राधिकरण समिती किंवा प्रभाग समिती या सर्व आपल्याच समित्या आहेत. आपण पूर्वी परिवहन समितीला या सभागृहात सभा घ्यायला सांगितले होते. परंतु, स्थायी समितीच्या सभागृहामध्ये जो काही ताण निर्माण होत होता, आपण त्या ताणाचा विचार करुन प्रभाग समितीची सभा त्या-त्या प्रभाग कार्यालयामध्ये घेण्यासाठी त्यांना विनंती केली. या सभागृहात फक्त वृक्षप्राधिकरण समितीची सभा होते. कारण वृक्षप्राधिकरण समितीचे अध्यक्ष हे मा. आयुक्त आहेत. दुसरी परिवहन सेवा समितीची सभा होते. परिवहन सेवा समितीच्या बैठकीची व्यवस्था दोन ते अडीच महिन्यात पूर्ण होईल. दोन अडीच महिन्यानंतर त्यांचे कार्यालय दुसरीकडे शिफ्ट झाले तर त्यांच्या सभासुध्दा तिथेच चालणार आहेत. या सगळ्या सेवा महापालिकेच्या अंतर्गत असल्यामुळे या सर्व सेवा आपल्याच आहेत. आपण याच भावनेने त्यांच्याकडे बघावे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपण परिवहन सेवा समिती आणि वृक्षप्राधिकरण समितीच्या सभा या सभागृहात घेऊया आणि बाकीच्या समित्यांच्या सभा त्यांच्या कार्यालयात होऊ द्या.

**गजानन भोईर :-**

बाकीच्या सभा नाहीत. आपण प्रभाग समितीच्या सभा इथे घेत नाहीत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्या दिवशी प्रभाग क्र. ०१ ची सभा स्थायी समिती सभागृहात झाली होती.

**प्रभात पाटील :-**

प्रभाग समितीच्या सभा स्थायी समितीच्या सभागृहात होतात.

**ग्रिटा फॅरो :-**

प्रभाग समितीची सभा इथे होऊ द्या.

**मा. सभापती :-**

या सभागृहात स्थायी समितीच्या सभेशिवाय दुसरी सभा घेऊ नका. कारण त्यामुळे सभेला काहीही अर्थ राहत नाही. सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रे सभापती पदावर निवडून आल्यापासून सर्व सभा स्थायी समिती सभागृहात होत आहेत असा विषय चर्चेला आहे. खरे म्हणजे हा एक प्रकारे माझा कमीपणा आहे. म्हणजे याच्यापुढे हे सभागृह इतर समित्यांना सभेसाठी देऊ नये असे माझे म्हणणे आहे.

**गजानन भोईर :-**

सभेला सुरुवात होण्यापुर्वी मी बोलू इच्छितो की, भाईंदर वासियांसाठी होळीचा महिना अतिशय खराब असतो. आतापासुन सुरुवात केल्यावर अठ्ठेचाळीस तासानंतर काही प्रभागांमध्ये पाणी गेलेले आहे.

**केशव घरत :-**

आमच्या प्रभागात सकाळपासुन पाणी यायचे. परंतु, आता दुपारी पाणी यायला लागलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

पाण्याचा संपूण प्रेशर डाऊन झालेला आहे. तुम्ही पाणी किती कमी येते ते बघा.

**रमेश जैन :-**

पानी का लिमिट ४८ से ५० घंटेतकका हो गया है।

**गजानन भोईर :-**

मी ज्या प्रभागत राहतो, त्या प्रभाग क्र. ०९ मध्ये पाणी व्यवस्थितरित्या येते. तिकडून पाईपलाईन जवळ आहे. म्हणून आम्हाला पाणी व्यवस्थित येते.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो की, मागील दि. ११ ते १६ तारखेच्या दरम्यान मागच्या दोन तीन महिन्यामध्ये एम.एस.बी.चा प्रॉब्लम आलेला नव्हता. पॉवर फेल्युअरमुळे तीन वेळा पातली पाडा आणि टेमघरला शटडाऊन झालेला होता. त्यामुळे आपल्याकडे तीन-तीन तासाचा पॉवर सप्लाय बंद झालेला होता. तिकडे तीन तासाचा पॉवर सप्लाय बंद झाला तर आपल्योडे त्याचा सहा तासाचा इफेक्ट होतो. पॉवर सद्याच आठ-दहा दिवस थोडा लेट झालेला होता. परंतु, अठ्ठेचाळीस तासाच्यापेक्षा जास्त वेळ पॉवर सप्लाय खंडित झालेला नव्हता. पॉवर सप्लाय लेट म्हणजे कमीत कमी छत्तीस तास खंडित झालेला होता. परंतु, आठ्ठेचाळीस तास खंडित झालेला नव्हता.

**गजानन भोईर :-**

साहेब, आपला पॉवर सप्लाय होळीमध्ये सतत तीन वर्ष खंडित झालेला आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर, तुम्ही प्रथम माझे ऐकून घ्या. आपण ग्रामीण भागात म्हणजे मुर्धा ते उत्तन आणि घोडबंदर इत्यादी भागातील वेळ बदललेली आहे. आपण त्या ठिकाणी दुपारची वेळ ठेवलेली होती. ही वेळ फक्त चार पाच दिवसांसाठी आहे. सोमवारपासुन तेच पाणी सगळ्यांना रेग्युलर जात होते. त्याप्रमाणे सगळ्यांना पाणी रेग्युलर जाणार आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, पाण्याचा प्रेशर संपूर्ण लो झालेला आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही चार-पाच दिवसासाठी कसे म्हणता?  तुम्ही पाण्याचे प्रेशर कमी केलेले आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

मी चार-पाच दिवसासाठी म्हटलेले कारण पाण्याचा जो ब्रेक डाऊन झालेला होता, तो लेव्हलमध्ये येण्यासाठी चार-पाच दिवसाची मुदत आहे. संपूर्ण मिरा भाईंदर शहरामध्ये वेळेची ॲडजेस्टमेन्ट करावी लागते. कारण मिरा भाईंदरमध्ये टाईमिंग बदललेले आहे. समजा, सगळ्यांनी एकाच वेळी म्हणजे सकाळी ६.०० वा. पाणी सोडले तर काही भागात म्हणजे गोडदेवच्या टाकीमध्ये वगैरे ठिकाणी पाणी पडत नाही. म्हणून हा टायमिंग ॲडजेस्ट केलेला आहे. हा टाईमिंग फक्त आठ दिवसापुरता आहे. हे सर्व सोमवारनंतर रेग्युलर होणार आहे.

**रतन पाटील :-**

हे सर्व सोमवारनंतर रेग्युलर होणार आहे. याची गॅरन्टी आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

हे सर्व सोमवारनंतर रेग्युलर होणार आहे याची गॅरन्टी आहे. कारण याबाबत सुधारणा चालू आहे.

**रतन पाटील :-**

आपण सकाळी चर्चा केलेली होती. आम्ही आमच्या प्रभागातील वस्तुस्थिती सांगितलेली होती.

**केशव घरत :-**

आपण जनरेटर घेणार होतो त्याचे काय झाले? त्याबाबतचा प्रस्ताव दिलेला होता का?

**रतन पाटील :-**

हल्ली पाणी एवढे कमी येते की, पूर्वी ज्या लोकांना दहा बादल्या मिळायच्या त्यांना आता चार बादल्या मिळायला लागलेल्या आहेत.  लोकांचा उद्रेक होत चाललेला आहे.  पाण्याचे प्रेशर खुपच कमी येत आहे. एखादा लहान मुलगा लघवी करतो त्या पध्दतीने पाणी येत आहे.  सन्मा. सदस्य गजानन भोईर बोलतात की, माझ्या प्रभागात पाणी व्यवस्थित येत आहे.  जर ह्यांच्या प्रभागात पाणी व्यवस्थित येत असेल तर आमच्या प्रभागात पाणी एवढे कमी का येते?  याचा खुलासा करावा.

**शिवाजी बारकुंड :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, तुमच्या झोनमध्ये गोडदेव टाकीकडे पाणी सुटते. मी आता तुम्हाला टाईमिंग बदलला असल्याचे सांगितलेले होते. तो टाईमिंग गोडदेव टाकीमध्ये ठराविक प्रेशरने पाणी पडण्यासाठी बदललेला आहे. चार-पाच दिवसात परिस्थिती पूर्ववत येणार आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. बारकुंड साहेब, माझ्या माहितीप्रमाणे ठाणे महानगरपालिकेच्या कार्पोरेशनचे काही अधिकारी मिरा भाईंदरचे पाणी सोडतात. ही माहिती खरी आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

आपल्या पाण्याचा कोटा ८६ एम.एल.डी. आहे. आपण ८६ एम.एल.डी. पाणी घ्यायला बांधील आहोत. आम्ही त्यांना मिरा भाईंदरला ८६ एम.एल.डी. पाणी देण्याची मागणी केलेली होती. आम्ही त्यांना सांगितले की, तुम्हाला टी.एम.सी.ला जेवढे पाणी द्यायचे असेल तेवढे पाणी द्या. परंतु, मिरा भाईंदरचे ८६ एम.एल.डी. पाणी कमी करायचे नाही. असेसुध्दा आम्ही त्यांना सांगितलेले होते.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, परंतु, चार-पाच दिवस पाणी कमी येत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ही माहिती खरी आहे की खोटी आहे ते सांगा? म्हणजे आपल्या मिरा भाईंदरला ८६ एम.एल.डी. पाणी दिलेले आहे. त्याच्यातील काही पाणी ठाणे महानगरपालिका घेते. त्यामुळे भाईंदरला ८६ एम.एल.डी. पाणी येत नाही. ही माहिती खरी आहे की खोटी आहे ते सांगा?

**शिवाजी बारकुंड :-**

मिरा भाईंदर क्षेत्रातील पाण्याचा कोटा ८६ एम.एल.डी.चा आहे. मी स्वतः एग्झिक्युटिव्ह इंजिनियरला भेटून मिरा भाईंदरला ८६ एम.एल.डी. पाणी देण्याची मागणी केलेली आहे. तुम्ही ठाणे महानगरपालिकेला किती पाणी देता ते बघणे आमचा लुकआऊट नाही. समजा आपले पाणी कमी झाले आणि ठाण्याला पाणी जास्त गेले तर आमची सगळी लोक तुमच्याकडे मोर्चा आणणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपली एगझॅक्ट काय पोझीशन आहे? आपल्याला रेग्युलर ८६ एम.एल.डी. पाणी मिळते की नाही?

**सुर्यकांत भोईर :-**

आपले पाण्याचे मीटर तपासून घ्या.

**शिवाजी बारकुंड :-**

मी तुम्हाला एग्झॅक्ट पोझीशन सांगितलेली आहे. मागच्या आठवड्यात दि. ११ ते १६ दरम्यान तीन वेळा ब्रेक डाऊन झालेला होता. त्यावेळेला कमी पाणी आलेले होते. म्हणून हा प्रॉब्लम निर्माण झालेला आहे.

**मिलन पाटील :-**

आपल्याकडे ८६ एम.एल.डी. पाण्याचे मीटर उपलब्ध असेल ना.

**शिवाजी बारकुंड :-**

आपल्याकडे ८६ एम.एल.डी. पाण्याचे प्रमाणे दर्शवणारे मीटर आहे. आपल्याकडे रोजचे रिडिंग उपलब्ध आहे. तसेच मी, तुम्हाला तीन वेळा पाणी कमी आल्याबाबत सांगितलेले आहे.

**मिलन पाटील :-**

आपल्याकडे ८६ एम.एल.डी. पेक्षा पाणी कमी आले असतानासुध्दा आपण त्या लोकांना ८६ एम.एल.डी. पाण्याचे बिल अदा करतो.

**शिवाजी बारकुंड :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील, आपण पाणी व्यवस्थित येते की नाही ते बघितल्याशिवाय ८६ एम.एल.डी. पाण्याचे बिल भरत नाही. आपल्याकडे मीटर रिडिंग उपलब्ध आहे. आपल्याकडे दररोज मीटर रिडिंग होत असते आणि जेवढे पाणी येते, आपण तेवढे बिल भरतो.

**गजानन भोईर :-**

आपण मीटर रिडिंगप्रमाणे बिल भरतो असा याचा अर्थ झाला.

**शिवाजी बारकुंड :-**

आपण मीटर रिडिंग प्रमाणे बिल भरतो.

**मोहन पाटील :-**

श्री. बारकुंड साहेब, तुम्ही चांगल्या पध्दतीने उत्तर दिले

**ज्युडी डिसोझा :-**

श्री. बारकुंड साहेब, भाईंदर वेस्टला पाण्याची टाकी आहे. परंतु, तरीसुध्दा जर पाण्याचा काही प्रॉब्लम आला तर कोणाला संपर्क करावा. आमच्याकडे पाणीपुरवठा खात्याचा फोन नंबर उपलब्ध नाही. आम्हाला प्रत्येक वेळेला ऑफिसमध्ये फोन करावा लागतो. ऑफिसचे कर्मचारी फोन घ्यायला कंटाळा करतात.

**शिवाजी बारकुंड :-**

पाण्याच्या टाकीवर फोनची व्यवस्था करण्यांत येईल.

**ज्युडी डिसोझा :-**

आम्ही कोणाला संपर्क करायचा?

**शिवाजी बारकुंड :-**

पाण्याबाबतच्या तक्रारींसाठी श्री. अरविंद पाटील हे भाईंदर वेस्टचे ज्युनियर इंजिनियर आहेत. यांना संपर्क करा.

**सुर्यकांत भोईर :-**

मिरा येथील एम.आय.डी.सी. या ठिकाणीसुध्दा फोनची सुविधा उपलब्ध नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

मी तुम्हाला श्री. अरविंद पाटील, ज्युनियर इंजिनियर भाईंदर वेस्ट यांचा फोन नंबर देतो.

**ज्युडी डिसोझा :-**

मला त्याचा फोन नंबर द्या.

**सुर्यकांत भोईर :-**

एम.आय.डी.सी. मिरा येथेसुध्दा फोनची सुविधा उपलब्ध करुन द्या.

**जयंत पाटील :-**

कोकणामध्ये शिवसेनेचा धुव्वा उडवून शिवसेनेच्या चिमण्यांना श्री. नारायण राणे यांच्या धाडसी वाघांनी तिथुन हाकलून लावले. तसेच कॉंग्रेसचे तीन आमदार आणि सांगलीमध्ये एक असे चार आमदार या निवडणूकीमध्ये निवडून आले. हा कॉंग्रेस पक्षाचा विजय आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस सहयोगी पक्षातर्फे चार आमदार निवडून आलेले आहेत. सध्या या राज्यात आमचे सरकार चाललेले आहे. मी त्या सरकारचे अभिनंदन करतो आणि मी या ठिकाणी ठराव मांडतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, तुम्ही चिमण्या वगैरे बोलू नका.

**जयंत पाटील :-**

मी चिमण्या वगैरे बोललेलो नाही. चिमण्या हा शब्द श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी काढलेला होता. मी या ठिकाणी त्यांचा शब्द वापरलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, तुम्ही या ठिकाणी आमदार असा जो उल्लेख केलेला आहे. तुम्ही त्या ठिकाणी युतीचें आमदार असे बोलले पाहिजे असे मला वाटते. कारण राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीची युती आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, चार आमदार नसुन तीन आमदार निवडून आलेले आहेत.

**रतन पाटील :-**

हा दहशतवादाचा विजय आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दहशतवाद करायलासुध्दा हिम्मत लागते.

**प्रभात पाटील :-**

मला ठराव मांडण्यापूर्वी एक सांगायचे आहे की, आपण भरपुर ठराव मांडतो. आपण जे ठराव मांडतो त्याच्यावर किती वेळा सही केलेली आहे? ते प्रथम सांगा. त्या ठरावाचे पुढे काय होते? ते ठराव तिथे पोहचतात का? ते ठराव तिथे पोहचणार असतील तरच ठराव मांडा. तुम्ही असे ठराव कधी सभागृहापुढे पाठविलेले आहेत का? आपले ठराव कधीच कुठे पोहचत नाहीत.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी फक्त कॉंग्रेस पक्षाचा ठराव मांडलेला आहे. परंतु, कॉंग्रेस पक्षाबरोबर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षसुध्दा होता. हे ते विसरलेले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

राष्ट्रवादीचे करेक्शन केलेले आहे.

**ज्युडी डिसोझा :-**

त्या ठरावात राष्ट्रवादीचा उल्लेख केलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

गेले अनेक वर्षे भाईंदर-उत्तन रस्त्याचा प्रश्न प्रलंबित राहिलेला आहे. आज आपल्याला यश मिळालेले आहे. आपल्या शहराचे प्रथम नगराध्यक्ष मा. श्री. गिल्बर्ट मेन्डोसा, पालकमंत्री श्री. गणेशजी नाईक साहेब, आमदार श्री. मुझफ्फर हुसेन साहेब आणि अशा लोकांनी जो प्रयत्न केलेला होता.

**रतन पाटील :-**

तुम्ही ह्याच्यामध्ये लोक प्रतिनिधींचासुध्दा उल्लेख करा. कारण आम्हीसुध्दा या रस्त्यासाठी फार प्रयत्न केलेले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सगळ्यांनी प्रयत्न केलेले आहेत. या ठिकाणी सगळ्यांचा उल्लेख केलेला आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

आम्ही सर्व प्रयत्न केले. तुम्ही काय प्रयत्न केले ते सांगा?

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्हीसुध्दा प्रयत्न केलेले आहेत.

**रतन पाटील :-**

आम्ही पाठपुरावा केला म्हणून भाईंदर-उत्तन रस्ता तयार झाला. इतके वर्षे तुम्ही काहीही केलेले नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब, आम्ही तुम्हाला करुन दाखविले.

**रतन पाटील :-**

आम्ही या रस्त्याला पाठपुरावा केलेला आहे.

**कैलासबेन जानी :-**

आम्ही तुमची सुचना मांडलेली होती.

**गजानन भोईर :-**

आम्ही या रस्त्याला पाठपुरावा केलेला होता.

**रतन पाटील :-**

आम्ही या रस्त्याला पाठपुरावा केलेला होता.

**जयंत पाटील :-**

जर तुम्ही एवढा पाठपुरावा कोकणमध्ये केला असता तर अशी परिस्थिती आली नसती.

**रतन पाटील :-**

कोकण वेगळे आहे. आपण या कोकणातील एक भाग आहोत. म्हणजेच आपला ठाणे जिल्हा हा एक कोकणातील भाग आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, सन्मा. सदस्य रतन पाटील वेगळे बोलत आहेत. परंतु, ज्यावेळेला युतीचे सरकार होते, आपण त्यावेळेला पाठपुरावा केलेला होता. आपल्याला त्यावेळेला यश आलेले होते का? आमच्या सरकारला यश आलेले आहे. त्याच्यासाठी पोटात दुखायचे कारण नाही.

**रतन पाटील :-**

आम्ही महानगरपालिका असताना पाठपुरावा केलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, पराभव पचवायलासुध्दा ताकद लागते. तुम्ही सांगा की, तुमच्याकडे ताकद आहे. त्यामुळे तुम्ही पराभव पत्कारा.

**रतन पाटील :-**

आम्ही पराभव पत्कारलेला नाही. आज या ठिकाणी तुम्ही आहात. उद्या आम्ही येऊ.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा एक ज्वलंत प्रश्न आहे. आज आपल्या शासनाचे मंत्री श्री. छगन भुजबळ साहेब यांच्या दालनात आपल्या मिरा भाईंदरचे नगरसेवक श्री. सुर्यकांत भोईर यांच्याबरोबर मिटींग लागलेली होती. त्या मिटींगला आपले कमिशनर साहेब, सभापती साहेब, माजी सभापती साहेब आणि सर्व नगरसवेक हजर होते. या सर्व नगरसेवकांच्या बैठकीमध्ये श्री. छगन भुजबळ साहेब यांनी पी.डब्लु.डी. विभागाला आदेश दिला आणि हा रस्ता बिना अटीशर्तीने हस्तांतरीत करण्याचे त्यांनी आदेश दिले. आज हे सभागृह त्यांचे या ठिकाणी अभिनंदन करीत आहे. या सभागृहातील ज्युनियर इंजिनियर श्री. दिपक खांबित यांनी चांगले सहकार्य केलेले आहे. त्यामुळे मी त्यांचेसुध्दा अभिनंदन करतो. मी संपूर्ण सभागृहात सांगु इच्छितो की, आपण श्री. छगन भुजबळ आणि इतर सर्व नेत्यांचे अभिनंदन करुया. मी या ठिकाणी त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**मा. सभापती :-**

माझे या गोष्टीला अनुमोदन आहे. हा प्रस्ताव माझ्या कारकीर्दीत घोषीत झालेला आहे. मला त्याबद्दल आनंद झालेला आहे. तसेच, आपल्या संपूर्ण शहराच्या विकासासाठी चांगला हातभार लागणार आहे. यासाठी माझे त्या ठरावास अनुमोदन आहे.

**मोहन पाटील :-**

त्या ठरावाचा उल्लेख करताना एक गोष्ट राहून गेली, ती म्हणजे आपला जो पाच किलोमीटर रस्ता होता. तो पाच किलोमीटर रस्ता तत्कालीन आमदार श्री. जनार्दन गौरी यांनी हस्तांतरित केला होता त्यांचा यामध्ये उल्लेख करण्यांत यावा.

**मा. सभापती :-**

मी सभापती म्हणून अनुमोदन दिलेले आहे. माझी या विषयाला मंजुरी आहे. त्यामुळे पुढील विषय घेण्यात यावा.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेब, माझी तुम्हाला नम्र विनंती आहे की, यापुढे होणाऱ्या सभेबाबत घोषणा देण्याची कृपा करावी.

**अभिनंदन ठराव क्र. १९९ :-**

कोकणामध्ये शिवसेनेचा धुव्वा उडवून शिवसेनेच्या चिमण्यांना श्री. नारायण राणे यांच्या धाडसी वाघांनी तिथुन हाकलून लावले. तसेच काँग्रेसचे तीन आमदार आणि सांगलीमध्ये एक असे चार आमदार या निवडणूकीमध्ये निवडून आले. हा काँग्रेस पक्षाचा विजय आहे. राष्ट्रवादी काँग्रेस सहयोगी पक्षातर्फे चार आमदार निवडून आलेले आहेत. सध्या या राज्यात काँग्रेसचे सरकार चाललेले आहे. त्या सरकारचे ही सभा अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १९३ चे वाचन केले.)

**प्रभात पाटील :-**

सचिव साहेब या इतिवृत्तांतामध्ये नवघर शाळेचे मैदान भाड्याने देण्याचा विषय वारंवार आलेला आहे. त्याचा काय निर्णय घेतला? ते सांगा. आपण मैदान भाड्याने देतो. ते शाळेसाठी भाड्याने द्यायचे आहे, नागरीकांसाठी भाड्याने द्यायचे आहे. आपण पालिकेच्या उत्पन्नासाठी मैदान भाड्याने देण्याचे गृहित धरलेले आहे का? मला काही कळत नाही म्हणून विचारले.

**प्र. सचिव :-**

प्रथम इतिवृत्तांताचे वाचन होऊ दे. नंतर तुम्ही तुमच्या समस्या मांडा.

**प्रभात पाटील :-**

तो सुद्धा एक इतिवृत्तांताचा भाग आहे.

**सुर्यकांत भोइर :-**

मा. सभापती महोदय, इतिवृत्तांताचा एक भाग म्हणून मी या ठिकाणी विचारतो की, आपण जुन्या बिल्डींग तोडण्याबाबत टेंडर काढलेले होते. तरीसुद्धा त्या इमारती अजुनपर्यंत तोडण्यात आलेल्या नाहीत? ते सांगा.

**गजानन भोइर :-**

मा. आयुक्त साहेबांना वाटेल की, मला तीन चार नगरसेवकांची एकदम पत्र आहेत. कारण आम्ही दोन तीन जणांनी पत्र लिहलेली आहेत. ह्याच्यावर चर्चा होइल की नाही याबाबत मा. आयुक्त साहेबांनी रुलिंग द्यावे.

**प्रभात पाटील :-**

मी त्या सभेला हजर नव्हती. तरिसुद्धा या इतिवृत्तांतामध्ये नवघर शाळेच्या मैदानाबाबत चर्चा केलेली होती असे हे इतिवृत्तांत वाचून झाल्यावर समजते.

**मा. आयुक्त :-**

नवघर शाळेच्या मैदानाबाबतचा ठराव झालेला आहे.

**जयंत पाटील :-**

परंतु, त्या ठरावावर इम्प्लीमेंन्टेशन दिलेले नाही.

**गजानन भोइर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी पत्र दिलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

नवघर शाळेच्या मैदानाबाबत पुढे काय कार्यवाही झाली सांगा.

**मा. आयुक्त :-**

स्थायी समितीने जो निर्णय घेतलेला आहे, जर स्थायी समिती त्या निर्णयाचा फेर विचार करित असेल तर हरकत नाही.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो की, नवघर शाळेच्या मैदानाचा विषय मागच्या स्थायी समितीमध्ये आलेला होता. तेव्हा सन्मा. सदस्या प्रभात पाटील हजर नव्हत्या. मी त्यावेळेला शाळेच्या मैदानाबाबत बोललो होतो की, मैदान आणि शाळेचे प्रांगण हे दोन्ही वेगळे आहेत कदाचित हे माझ्या इतिवृत्तांतामध्ये असेल. तुम्ही हा विषय पुढच्या वेळेला आणा. त्याच्यावर संपुर्ण चर्चा करून त्याच्यावर निर्णय घ्या.

**गजानन भोइर :-**

ते मैदान नाही.

**मोहन पाटील :-**

मी मागच्या वेळेला मैदान आणि शाळेचे प्रांगण यातील फरक सांगितलेला होता.

**प्रभात पाटील :-**

तेथे शाळा आहे म्हणून आपण त्याला प्रांगण बोलतो.

**जयंत पाटील :-**

ते शाळेचे मैदान आहे.

**प्रभात पाटील :-**

आम्ही नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानाविषयी बोलत नाही.

**गजानन भोइर :-**

जर तुम्हाला मैदान भाड्याने द्यायचे असेल तर नेताजी सुभाशचंद्र बोस मैदान भाड्याने द्या.

**मिलन पाटील :-**

नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान कधीही भाड्याने दिले जाणार नाही. आम्ही ते मैदान भाड्याने देऊ देणार नाही.

**रतन पाटील :-**

नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान भाड्याने दिलेले होते. त्या मैदानात कार्यक्रमसुद्धा झालेले होते.

**मिलन पाटील :-**

नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान फक्त खेळण्यासाठी आहे. त्यामुळे ते मैदान भाड्याने दिले जाणार नाही.

**रतन पाटील :-**

तुम्हीच नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान भाड्याने दिलेले होते.

**मिलन पाटील :-**

आम्ही त्या मैदानासाठी आंदोलन करु. परंतु मैदान भाड्याने देणार नाही.

**गजानन भोइर :-**

तुम्ही नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान भाड्याने देऊ नका. परंतु, नवघर शाळेचे मैदानसुद्धा भाड्याने देऊ नका.

**मिलन पाटील :-**

तुम्ही आम्हाला ते मैदान भाड्याने द्यायला का सांगता?

**ग्रिटा फेरो :-**

नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान हे एक प्ले ग्राउन्ड आहे.

**गजानन भोइर :-**

नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान हे एक प्ले ग्राउन्ड आहे. ते मैदान भाड्याने दिले नाही तरी चालेल. परंतू शाळेचे मैदान भाड्याने देणे कितपत योग्य आहे ते सांगा. शाळेचे मैदान भाड्याने द्यायलाच नको.

**रतन पाटील :-**

तुम्हीच शाळेचे मैदान भाड्याने दिलेले आहे. त्या मैदानात भरपूर कार्यक्रम झालेले आहेत.

**मिलन पाटील :-**

तुम्हाला तुमच मैदान भाड्याने द्यायचे नाही. म्हणून तुम्ही आमच्या मैदानाबाबत बोलू नका.

**रतन पाटील :-**

तुमच आमच काय करता? ते मैदान शहराची शान आहे.

**गजानन भोइर :-**

तुमच आमच काय करता?

**मिलन पाटील :-**

तुम्ही नवघर शाळेचे मैदान भाड्याने द्या. भाईंदर वेस्टचे मैदान भाड्याने देउ नका.

**रतन पाटील :-**

तुमच आमच करु नका. कारण ती तुमची मालमत्ता नाही. ती महापालिकेची मालमत्ता आहे.

**मा. सभापती :-**

या विषयावर चर्चा नको. मागच्या स्थायी समितीमध्ये ठरल्याप्रमाणे मा. सभापती मोहन पाटील असताना नवघर शाळेचे मैदान भाड्याने देण्याबाबत ठराव झालेला होता. आपण याचा फेरविचार पुढच्या मिटिंगला घेउया आपण हा विषय घेउन त्याप्रमाणे जे काही करायचे आहे ते ठरवुया.

**प्रभात पाटील :-**

मा. सभापती साहेब तुम्ही फेरविचाराचा विषय आणला म्हणून मी बोलते आणि या इतिवृत्तांताचा या विषयाशी संबंध आहे. कदाचित या इतिवृत्तांतामध्ये तो विषय नसेल. तुम्ही मा. सभापती पदावर आल्यापासून मी तिन पत्र लिहलेली आहेत की, मिरा भाईंदरच्या गरिब नागरिकांसाठी रक्त, लघवी, तपासणीसाठी एक केंद्र असावे. तुम्ही प्रत्येक वेळेला उत्तर देता की, आपण हा विषय पुढच्या वेळेला घेउ. आता हा विषय पुढच्या वेळेला घेणार आहात की नाही.

**मा. सभापती :-**

मी या विषयाशी संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा करून हा विषय वारंवार चर्चेला आणलेला होता. सध्या डॉ. बावसकर यांची बदली झाल्यामुळे आपण आता नविन डॉ नेमणार आहोत. आपण त्याच्यानंतर हा विषय घ्यायचा आहे.

**मोहन पाटील :-**

हा विषय महासभेचा झाला.

**प्रभात पाटील :-**

हा विषय महासभेचा कसा होउ शकतो?

**मोहन पाटील :-**

हा विषय धोरणाचा आहे.

**प्रभात पाटील :-**

हा विषय धोरणाचा कसा असेल? आपल्यला हे आरोग्यकेंद्र संपूर्ण मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये दोन ठिकाणी म्हणजे ईस्ट आणि वेस्टला करायचे आहे.

**मोहन पाटील :-**

तूम्ही आरोग्य केंद्र दोन ठिकाणी करा किंवा एका ठिकाणी करा. परंतु, तुम्ही ज्या पद्धतीने काम करणार आहात ते एक धोरण ही एक वेगळी गोष्ट आहे. परंतु, हे एक धोरण आहे त्यामुळे हा विषय महासभेपुढे जाईल.

**प्रभात पाटील :-**

तो विषय धोरणात्मक निर्णय घेण्याचा नाही.

**रतन पाटील :-**

धोरणात्मक निर्णय घ्यायला एवढा वेळ का लागतो? मिरा भाईंदर माहनगरपालिकेच्या नागरीकांच्या सोयीसुविधांच्या प्रश्नासाठी धोरणात्मक निर्णय घ्यायला वेळ लागायला नको हा विषय लगेच घ्या.

**मा. सभापती :-**

आपण डॉक्टरची नेमणूक झाल्यानंतर विचार करुन हा विषय घेउया.

**मा. आयुक्त :-**

डी. पी. च्या रस्त्याला मंजुरी आहे का?

**रमेश जैन :-**

रु. ५ लाख मंजुर किया है।

**केशव घरत :-**

साहेब, माझा एक प्रश्न विचारायचा होता की, शाळेच्या विद्यार्थ्यांना गणवेश मिळाले का?

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रथम प्रोसीडींगचा विषय संपू द्या. शाळेच्या विद्यार्थ्यांना गणवेश देण्याचा विषय नंतर घेउया.

**गजानन भोइर :-**

मागच्या मिटिंगमध्ये ड्रेस देणार असे सांगितलेले होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

या विषयाशी संबंधित अधिकारी येउ दे मगच विषय घेउया.

(सन्मा. सदस्य श्री. एस्. ए. खान ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, इतिवृत्तांतामध्ये मिरा गावचे वॉर्ड ऑफिस अजुनपर्यंत तोडलेले नाही. ते वॉर्ड ऑफिस तोडायला काय प्रॉब्लेम आहे? तुम्ही ते ऑफिस कधी तोडणार आहात.

**दिपक खांबित :-**

आपण मुर्ध्याची शाळा आणि चेन्याची शाळा तोडलेली आहे. सध्या पर्यायी व्यवस्था चालू आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

मी याबाबत श्री. कुदरे साहेबांशी बोललो होतो. श्री. कुदरे साहेब रिपोर्ट दिले असे बोलत होते. परंतु, तिथे कार्यवाही करायला कोणी येत नाही.

**दिपक खांबित :-**

आपण स्वतः जाउन कार्यवाही करूया.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, शाळेचा गणवेश विद्यार्थ्यांना मिळाला की नाही त्याची सविस्तर माहिती द्या. कारण सन २००६ संपायला तीन महिने बाकी आहेत.

**केशव घरत :-**

पुढच्या वर्षीच्या गणवेशाची तयारी आता करा.

**प्रभात पाटील :-**

मागच्या वेळेला गणवेश दिले असे सांगितलेले आहे.

**केशव घरत :-**

परंतु आता सहा महीन्याचा कालावधी निघुन गेलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

फक्त बालवाड्यांना गणवेश दिलेले होते. दुसऱ्या वर्गांना गणवेश दिलेले नव्हते.

**प्रभात पाटील :-**

सगळ्यांना गणवेश दिलेले आहेत.

**गजानन भोइर :-**

सगळ्यांना गणवेशाचे वाटप केलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

सगळ्यांना गणवेश दिलेले नाहीत.

**केशव घरत :-**

शाळा सुरू होताना गणवेशाचे वाटप होणे आवश्यक आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

मुलांची शाळा सन २००७ मध्ये चालू होणार. त्यामुळे गणवेशाचे वाटप आताच करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याला त्यावेळेला ठेकेदाराची निवड करावी लागते.

**केशव घरत :-**

प्रत्येक वर्षी गणवेशाचे वाटप होणे आवश्यक आहे.

**मोहन पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, आपल्याकडे शाळांच्याबाबतीत जी काही व्हायला पाहिजे ती कामे प्रलंबित राहतात. स्थायी समितीमध्ये प्रत्येक वेळेला हा विषय येतो. स्थायी समितीच्या सन्मा. सदस्यांना ज्या कामांबद्दल साशंकता असते. ती कामे होणे आवश्यक आहे. साशंकता म्हणण्यापेक्षा कामाविषयी अतिशय आस्था असते. त्यामुळे सन्मा. सदस्या प्रभात पाटील हा विषय वेळोवेळी काढतात. कारण त्या प्राधान्याने शिक्षिका आहेत. इतर सन्मा. सदस्यासुद्धा या ठिकाणी आहेत. ते फार वेळ घेउ शकत नाही. ३१ तारखेला शिक्षण मंडळ येत आहे. तुम्ही सर्व विषय वेळच्या वेळी वर्ग करून घ्या आणि त्या विषयावर योग्य निर्णय घ्या. हा विषय पुन्हा निघेल. या ठिकाणी शिक्षण अधिकारी उपस्थित नाहीत. तुम्ही त्या संबंधित समित्यांना ते विषय लवकर द्या. गणवेश वेळेवर आले पाहिजेत. त्या विद्यार्थ्यांना वेळेवर स्टाफ मिळाला पाहिजे. साहित्यसुद्धा वेळेवर मिळाले पाहिजे अशा पद्धतीचे काम प्रशासनाकडुन समिती आणि शिक्षण मंडळाकडे वेळच्या वेळी वर्ग झाले पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, माझी अशी सुचना आहे की आपल्या उपायुक्तांना शिक्षण मंडळाचा एक्स्ट्रा चार्ज दिला तर फरक पडेल का?

**मोहन पाटील :-**

शिक्षण मंडळ आणि शिक्षण समिती हे दोन्ही विषय घेउ शकतील पुन्हा अनुशंघाने शिक्षण अधिकारी येईल तुम्ही अशापद्धतीने विषय घ्या.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, आपल्या महापालिकेच्या एकुण २९ शाळा आहेत. त्या शाळांची एवढी दयनिय अवस्था आहे की जे दुसरी, तिसरी इयत्तेत शिकणारे विद्यार्थी आहेत. त्यांना पाढे किंवा अ, आ, इ, ई सुद्धा येत नाही. याच्यावर लक्ष द्या कारण आपण शिक्षणासाठी लाखो रुपये खर्च करतो. तसेच त्या विद्यार्थ्यांना गणवेश देतो. त्या विद्यार्थ्यांना सर्व सुविधा पुरवितो असे असुनसुद्धा आपल्या महापालिकेच्या

शाळेची शैक्षणिक अवस्था अशी का आहे? मा. आयुक्त साहेब, याच्यावर निश्चितपणे लक्ष केंन्द्रित करणे आवश्यक आहे. कारण आपण लाखो रुपयाचा खर्च करित आहोत.

**मोहन पाटील :-**

आपण काही करत नाही. आपण फक्त बोलतो आपण काही करणार नाही आणि फक्त बोलणार. म्हणुन मी सांगतो की तुम्ही विषयाला धरुन बोला.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब विषय धरुन बोलायचे सोडून द्या. तुम्ही किती शाळेत गेला ते मला सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, सर्व शिक्षण अभियानामध्ये कोणीही शिक्षिका जात नाही. त्या विद्यार्थ्यांना घेउन येत नाही. फक्त जे विद्यार्थी असतात. तेच त्यांच्याकडुन अभ्यास करून घेतात.

**मोहन पाटील :-**

यासाठी माझे असे म्हणणे आहे की आता शिक्षण समिती स्थापन होत आहे आणि आता शिक्षण मंडळ स्थापन झालेले आहे. शिक्षण मंडळाची ३१ तारखेला निवडणुक आहे. म्हणुन मी कमिशनरसाहेबांना सांगितले की आपला शैक्षणिक कारभार त्या समित्यांकडे वर्ग करा आणि काम करुन घ्या. पुर्वी समित्या नव्हत्या. त्याच्यामुळे आता आम्ही स्थायी समितीला वारंवार सांगून काम करित होतो. आम्ही हे काम करा, ते काम करा, गणवेश मिळत नाहीत, त्या विद्यार्थ्यांना शिक्षण व्यवस्थितरित्या दिले जात नाही असे आम्ही स्थायी समितीला सांगितलेले होते. यासाठी आता दोन समित्या स्थापन होत आहेत. त्या दोन समित्या स्थापन होत आहेत. त्या दोन समित्या जानेवारी महिन्यामध्ये स्थापन होत आहेत तुम्ही सर्व कामकाज प्रशासनामार्फत वर्ग करा असे माझे म्हणणे आहे.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, तुम्ही म्हणता की विषय देउ नका. परंतु, माझे म्हणणे आहे की, आपण किती शाळांमध्ये फेऱ्या मारलेल्या आहेत?

**मोहन पाटील :-**

मी सर्व शाळांमधुन फेरी मारलेली आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही आम्हाला त्या शाळांमधील परिस्थिती सांगा.

**मोहन पाटील :-**

आम्हाला त्या शाळांची परिस्थिती माहिती आहे.

**रतन पाटील :-**

प्रथम तुम्ही शाळांची परिस्थिती सांगा. आम्ही नंतर बाकीची परिस्थिती सांगतो.

**मोहन पाटील :-**

आम्हाला सर्व शाळांची परिस्थिती माहिती आहे. म्हणुन तुमच्या शाळेचा विकास होत आहे.

**रतन पाटील :-**

तुमच्या मस्टरमध्ये कुठल्या शाळेची सही आहे ते सांगा.

**मोहन पाटील :-**

तुम्ही प्रगती नाही असे का बोलता? दहा वर्षापंर्वी जी परिस्थिती होती. ती परिस्थिती आज आहे का?

**रतन पाटील :-**

तुम्ही नुसते बोलु नका. आम्ही आमच्या समस्या मांडत आहोत. महापालिका जो खर्च करते तो पैसा वाया जाउ नये असा आमचा उद्देश आहे. अशी आमची कळकळ आहे.

**मोहन पाटील :-**

ही कळकळ इतरांना नाही. फक्त तुम्हाला एकट्याला आहे का?

**रतन पाटील :-**

इतरांना सुद्धा कळकळ आहे.

**जयंत पाटील :-**

आम्हालासुद्धा कळकळ आहे.

**मोहन पाटील :-**

सगळ्यांना कळकळ निर्माण व्हायलाच पाहिजे. माझ्या मते मतभेद असायला पाहिजे. परंतु, मनभेद नको.

**प्रभात पाटील :-**

माझी अशी एक सुचना आहे की, सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, तुम्ही गेल्या वेळेला सभापती होतात. दि. ८ मार्च हा जागतिक महिला दिन असतो. कोणत्याही समितीमार्फत म्हणजे महिला व बालकल्याण समिती किंवा शिक्षण समिती असली तरी हा दिवस पाळला जातो. कमिशनर साहेब तुम्ही नविन

असल्यामुळे मी तुम्हाला गेल्या वर्षीची एक घटना सांगते. कोणाला काही कळत नाही असे मी म्हणत नाही. परंतु, मला जे कळते ते मी तुम्हाला सांगते. गेल्या वर्षी सावित्रिबाई फुले पुरस्कार ह्यांनी एक बाई आणली तिला दिला, त्यांनी एक बाई आपली तिला दिला. कोणलाही पुरस्कार देण्याएवढी खालच्या दर्जाची सावित्रिबाई फूले नव्हत्या. सावित्रिबाई फूले पुरस्कार कचऱ्यासाखे वाटले गेले. दि. ८ मार्चला जागतिक महिला दिन आला. तेव्हा मुख्याध्यापकांना कळविले गेले की, तुमच्या शाळेतील शिक्षिका सावित्रीबाई फुले पुरस्कारासाठी नॉमिनेट करा. आपण पालिकेच्या शाळेची जी अवस्था आहे. या शाळांमधील कुठल्याही एका शिक्षिकेला पुरस्कृत केले गेले. त्या पुरस्काराच्या श्रेणीची कुठेही खातरजमा न करता ते आदर्श शिक्षिका पुरस्कार कोणालाही वाटले गेले. ही चुक यावेळेला पुन्हा होता कामा नये हे मी तुम्हाला आताच सांगते. तुम्ही सभापती आहात. सावित्रिबाई फुले आणि जागतिक महिला दिनाचे असे अवचित्य असावे की ज्यांचे या समाजासाठी आणि भारतातील तळागाळाच्या लोकांसाठी काही ना काही तरी योगदान असले पाहिजे. शाळेतील शिक्षिका काय करतात? हे सगळ्यांना महिती आहे. ते पुरस्कार खिरापतीसाठी वाटले जाउ नये असे माझे म्हणणे आहे. पुरस्कार वाटपाबाबतचे प्रकरण तुमच्या परवानगीसाठी येईल.

**मा. सभापती :-**

तुम्ही या सभागृहाच्यावतीने बोलता. परंतु, मी त्या सभेतील शिक्षिकांना बोललो की तुम्ही काय किती पाठपुरावा करता ते आम्हाला माहिती आहे.

**प्रभात पाटील :-**

आपण तरीसुद्धा त्या शिक्षिकांना मिरा भाईंदर महानगरपालिका आदर्श शिक्षिका हे हेडिंग देतो.

**मा. सभापती :-**

गेल्यावर्षी जे झाले ते चुकीचे आहे.

**गजानन भोईर :-**

आदर्श शिक्षिका ची व्याख्या काय आहे?

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटील यांच्या मताशी मी सहमत आहे.

**प्रकरण क्र. १९३ :-**

दि. ३०/११/२००५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. २०० :-**

दि. ३०/११/२००५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. एस्. ए. खान.** **अनुमोदन :- श्री. मोहन म. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १९४ चे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

हे खोडून टाका. कारण आता जानेवारी महिना निघुन गेलेला आहे. आपल्याला जुलैच्या आसपास मिळेल आपण एवढे घेतो. एवढे जानेवारी महिन्याच्या एन्डला घ्या किंवा नंतर घ्या असे असते का?

(सन्मा. सदस्या श्रीम. ज्युडी डिसोझा ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

मला एक माहिती पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

यांना प्रशासन माहिती देईल.

**मिलन पाटील :-**

एक चिमणी असताना आवाज कशाला करता? इथे भरपूर कावळे आहेत. इथे चिमणीचे चालणार नाही.

**गजानन भोईर :-**

एवढे सगळे असताना तुम्ही एकाबरोबर का बोलता?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. गजानन भोईर साहेब, त्यांना माहिती द्यायला महापालिका प्रशासन आहे. त्यांनी जाउन सांगावे. इथे कशाला विचार करता?

**रतन पाटील :-**

सभापती साहेब आपण सदर सुरक्षा रक्षक वेतनासाठी रू. ६० लाख ज्या विभागातुन काढतो किंवा आपल्याकडे आरोग्य विभागात जी तरतुद आहे त्याबाबत मला असे विचारायचे आहे की, आज आपल्या मिरा भाईंदरच्या आरोग्य विभागाची काय परिस्थिती आहे? आज आपल्या मिरा भाईंदर विभागामध्ये मच्छरने खुप थैमान मांडलेले आहे. आपल्याकडे आज डेंग्यू, मलेरीया, काविळ सारख्या रोगाचे प्रमाण वाढत आहे. आपण ही तरतुद ज्या विभागासाठी वापरायला पाहिजे आपण ती तरतुद त्या विभागासाठी न वापरता सुरक्षा रक्षकासाठी वापरतो हे योग्य नाही. आता सन्मा. सदस्या प्रभात पाटील बोलल्या की, आपण लघवी, रक्त किंवा अन्य तपासणीसाठी ज्या सुविधा उपलब्ध करायच्या आहेत. त्याच्यासाठी हे काम आरोग्य विभागातुनच केले जाते. तुम्ही तसे न करता हा निधी दुसरीकडे वळवता हे योग्य नाही. ११४ हत्यारी म्हणजे आपल्या महापालिकेत हत्यारी आहेत. ज्यांनी शहानिशा केलेली आहे. त्यांनी मला याबाबत माहिती द्यायची आहे. मा. सभापती साहेब, आपल्याकडे ११४ हत्यारी आहेत का? आपल्याकडे त्याचे लायसन्स आहेत का? आपल्याकडे त्याचे जमा केलेले फोटोपास आहेत का? त्याची मला माहिती द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

हे ११४ हत्यारी कुठे कुठे आहेत? त्या सगळ्याची डिटेल माहिती द्या.

**रतन पाटील :-**

हे हत्यारी कुठे कुठे आहेत? त्याचीसुद्धा डिटेल माहिती द्या.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. मी त्या प्रश्न संदर्भात खुलासा करु इच्छितो की, हत्यारी सुरक्षा रक्षकांची संख्या ११४ आहे त्या ११४ चे असे ब्रेक अप आहे. मुख्यालय लिफ्टमन हत्यारी सहा, पाण्याची टाकी तीन, अग्निशमन कार्यालय पाण्याची टाकी तीन, मिरा पम्पिग स्टेशन तीन, नवघर प्राथमिक शाळा तीन, नगरभवन कार्यालय तीन, सुदामानगर पाण्यची टाकी भाईंदर तीन, स्मशानभुमी भाईंदर तीन, आयुक्त महापौर तीन, मिरा रोड स्मशानभुमिला नाही, पाण्याची टाकी तीन, जेसल पार्क पाण्याची टाकी तीन, बंदरवाडी शाळा......

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, चौघांना याची झेरॉक्स कॉपी दिली तर बरे होइल.

**मा. आयुक्त :-**

तसे असेल तर आम्ही झेरॉक्स कॉपी देतो.

**जयंत पाटील :-**

साहेब, आमच्या काही अशा शंका आहेत की, स्मशानात असणारे वॉचमन हत्यारी का? तिथे मेलेली माणसे जाणार आहेत. आपल्याला आणखी कोणाला मारायचे आहे? ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

त्यांनी या ठिकाणी स्मशानभुमीचा उल्लेख केलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

ह्याच्यामध्ये स्मशानभुमीचा सुद्धा उल्लेख आहे.

**जयंत पाटील :-**

आता साहेबांनी वाचलेले आहे.

**मोहन पाटील :-**

स्मशानभुमीतील प्रेते उकरुन काढलेली होती हे बरोबर आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्या हत्यारीने तिथुन कवट्या कशा उचलुन नेल्या? याचा प्रथम खुलासा द्या.

**जयंत पाटील :-**

आमचे म्हणणे प्रेते उकरुन काढली असेच आहे. परंतू, त्यांनी नंतर काय केले? ते सांगा.

**मा. सभापती :-**

लिफ्टमेनला हत्यारी ठेवावे लागतील.

**जयंत पाटील :-**

लिफ्टमेनला हत्यारीची आवश्यकता नाही.

**गोविंन्द परब :-**

लिफ्टमेनच्या कॉलममध्ये स्ट्रोक असल्यामुळे त्यांना चुकुन वाचन केलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

ऑलरेडी कहा हत्यारी दिलेले आहेत.

**केशव घरत :-**

माझा दुसरा असा प्रश्न आहे की प्रत्येक शाळेला गार्ड दिलेले आहेत का?

**गजानन भोईर :-**

तुम्ही ती लिस्ट वाचुन दाखवा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे मी त्याबाबत असे सांगू इच्छितो की मुख्य कार्यालयाला ऑब्लिक करुन लिफ्टमेन असा उल्लेख केलेला आहे. ते हत्यारी लिफ्टमेनसाठी नसुन मुख्य कायार्लयामध्ये सहा हत्यारी आहेत.

**केशव घरत :-**

साहेब, माझा प्रश्न असा आहे की फक्त काही शाळांनाच हत्यारी गार्ड दिलेले आहेत का?

**प्रेमनाथ पाटील :-**

हे गार्ड मिरा भाईंदरमधील २९ शाळांना दिलेले आहेत का?

**केशव घरत :-**

हे गार्ड सगळ्या शाळांना न देता काही शाळांनाच का दिलेले आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

अतिदक्षतेचा इशारा दिलेला आहे का?

**मोहन पाटील :-**

आपल्याकडे दोन तीन हत्यारीची आवश्यकता आहे. ज्या ठिकाणी जास्त विद्यार्थी आणि पालक असतात. त्या ठिकाणी हत्यारीची आवश्यक्यता आहे.

**केशव घरत :-**

साहेब, हत्यारी का दिले जातात?

**गजानन भोईर :-**

आपला हत्यारी देण्याचा नक्की उद्देश काय आहे? दहा मुले असतील किंवा हजार मुले असोत, मुले पळविली जातात का? कायदा सर्वांना सारखा झाला पाहिजे.

**मोहन पाटील :-**

शहरामध्ये वेगळा प्रकार आहे. लांबच्या ठिकाणी म्हणजे घोडबंदर वगैरे सारख्या ठिकाणी शांतता असते.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, आजपर्यंत हत्यारीचा वॉचमेनने काय उपयोग केलेला आहे? ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

श्री. गोविंद परब आपल्या हत्यारी घेण्याबाबतचे कारण सांगत आहेत.

**जयंत पाटील :-**

आम्हाला हत्यारीचे कारण आणि घडलेले प्रकार सांगा.

**गोविंद परब :-**

नवघर शाळेत दोन तीन वर्षापुर्वी दोन तीन वेळा शाळा तोडून मुलांचे खाऊसुद्धा पळवलेले होते. तेव्हापासुन आपण त्या ठिकाणी हत्यारी ठेवायला लागले आहोत.

**जयंत पाटील :-**

मला नवघर शाळेविषयी बोलायचे आहे की, तेथील अन्नधान्य कोणीही पळविलेले नव्हते. माजी शिक्षण अधिकारी सर्व धान्य विकायचा.

**प्रभात पाटील :-**

मी नवघर शाळेविषयी बोलू इच्छिते की, सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब, नगराध्यक्ष असताना मी त्या ठिकाणी शाळेच्या बाजूला रहायला गेलेली होती. तेव्हा तिथे अनैतिक प्रकार चालू होते.

**जयंत पाटील :-**

आम्हाला ही गोष्ट मंजूर आहे.

**प्रभात पाटील :-**

या प्रकारामुळे तिथे हत्यारी ठेवण्याची माझी मागणी होती आणि मी पहिल्यांदा हत्यारी ठेवायला सांगितले होते. मीच तिथे हत्यारी माणूस पाहिजे अशी मागणी केलेली होती.

**सुर्यकांत भोईर :-**

मिरा रोडच्या मुन्शी कंपाऊन्डमध्ये बालवाडीचे अन्न ठेवले जाते. तिथेसुध्दा चोऱ्या होतात. मग तुम्ही तिथे हत्यारी का ठेवले नाहीत?

**केशव घरत :-**

साहेब, काही शाळांमध्ये अजूनपर्यंत शिपाई नाहीत. घोडबंदर शाळेमध्ये एकूण ५०० विद्यार्थी आहेत आणि त्या शाळेत फक्त एक शिपाई आहे. त्या शिपायाने झाडू मारायची आणि विद्यार्थ्यांना खिचडी वाटायची. याच्यासाठी फक्त एक शिपाई आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

शिपाई आणि सेक्युरिटी गार्ड हे दोन्ही वेगळे आहेत.

**केशव घरत :-**

शिपाई आणि सेक्युरिटी गार्ड वेगवेगळे असले तरी हा एकच विषय आहे.

**मिलन पाटील :-**

साहेब, भाईंदर पश्चिमला सेक्युरिटी गार्ड आहे. आमची त्या ठिकाणी सामाजिक संस्था आहे. ती संस्था लाकडाची सोय कमी भावात करते. त्या ठिकाणी हत्यारी असुनसुध्दा शेजारचे झोपडपट्टीवाले लाकडे उचलून घेऊन जातात. तिथे ते हत्यारी काहीही करीत नाहीत? आम्ही त्यांना दोन-तीन वेळा सांगितले की, इथुन लाकडे चोरीला जातात तर तो इकडे असतो. त्यामुळे त्याच्यावर कडक कारवाई होणे आवश्यक आहे.

**गजानन भोईर :-**

असे प्रकार फक्त भाईंदर पश्चिमला न घडता सगळीकडे घडत आहेत.

**मिलन पाटील :-**

आम्ही जे प्रत्यक्षात बघितलेले आहे. ते तुम्हाला सांगितलेले आहे. त्या हत्यारीला समज द्या की, ह्याच्यापुढे लाकडे चोरीला जाता कामा नये. ती लोक मेलेल्या माणसांना स्वस्त दराने लाकडे देतात.

**गजानन भोईर :-**

लाकडे जाऊ दे. मेलेल्या माणसांच्या कवट्या जातात त्याचे काय?

**मोहन पाटील :-**

स्मशानात जे बोर्ड लावलेले आहेत ते काढा.

**प्रभात पाटील :-**

ते बोर्ड काढण्याची कोणाची हिम्मत नाही. त्यामुळे ते बोर्ड निघणार नाहीत.

**रतन पाटील :-**

महापालिकेकडे ११४ लायसन्स आणि फोटोपास आहेत का? आपल्या अधिकाऱ्यांनी पाहणी केलेली आहे का? जर अधिकाऱ्यांनी पाहणी केलेली असेल तर पाहणी केलेली आहे असे अधिकाऱ्यांनी सांगावे.

**मा. आयुक्त :-**

सुरक्षा रक्षकाकडे जी हत्यारे आहेत. त्याचे लायसन्स आणि फोटोपास संबंधित अधिकाऱ्यांनी चेक केलेले आहेत का?

**मा. सभापती :-**

आपल्याला सुरक्षा रक्षकाच्या ॲड्रेसचीसुध्दा आवश्यकता आहे.

**मिलन पाटील :-**

डिसेंबर महिन्यामध्ये सर्व लायसन्स वगैरे चेक होतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

एखादा माणूस उत्तर प्रदेशमधुन आला असेल आणि इथे त्याचे काय झाले, मग तुम्ही काय करणार?

**सुर्यकांत भोईर :-**

इकडे सर्व यु.पी.चे लोक आलेले आहेत. त्यांच्याकडे बंदुका असतात. ते यु.पी.ला गुन्हा करतात आणि नोकरीसाठी इकडे येतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

इकडे सर्व यु.पी., बिहारचे लोक आलेले आहेत. ते तिकडे गुन्हे करतात आणि इथे येतात. त्याच्यामुळे उद्या आपल्याला त्रास संभवू शकतो.

**केशव घरत :-**

परंतु, त्यांच्याकडे यु.पी.चे लायसन्स आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आम्हाला सगळ्यांच्या लायसन्सची झेरॉक्स द्या.

**मा. सभापती :-**

मी तुमच्या सर्वांच्या मताशी सहमत आहे. कारण अधिकाऱ्यांकडे तशी माहिती उपलब्ध नाही आणि त्यांनी अशी महिती घेतलेली नाही ही सत्य परिस्थिती आहे.

**रतन पाटील :-**

हा विषय पुढच्या वेळेला घ्या.

**सुर्यकांत भोईर :-**

हा विषय पुढे जाऊ द्या.

**मोहन पाटील :-**

हा विषय पुर्ननियोजनाचा आहे.

**रतन पाटील :-**

हा विषय पुर्ननियोजनाचा असल्याने काहीही फरक पडत नाही.

**मोहन पाटील :-**

पुर्ननियोजन आणि महिती मागवणे हे दोन्ही वेगळे विषय आहेत.

**रतन पाटील :-**

साहेब, या ठिकाणी खोटा कारभार चाललेला आहे असे मी स्पष्टपणे सांगतो. आपल्याकडे ११४ हत्यारी उपलब्ध नाहीत. महापालिकेने जे सुरक्षा रक्षक नेमलेले आहेत ते कुठे काम करीत आहेत याचा खुलासा करावा.

**जयंत पाटील :-**

तुम्ही आम्हाला या विषयाच्या टिपणीची झेरॉक्स द्या.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, तुम्हाला एवढे सांगायची गरज नाही. मी तुमच्या मताशी सहमत आहे बोलल्यावर विषय संपला.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही आम्हाला याची झेरॉक्स द्या.

**मा. सभापती :-**

सर्वांना झेरॉक्स देण्यात येणार आहे. माझ्या गावात एक मराठी शाळा आहे. आम्ही त्या शाळेतील वॉचमनला पगार देतो आणि ते वॉचमन त्याच ठिकाणी राहतात. आपल्याला त्या वॉचमनना राहण्याची सोय उपलब्ध करुन दिली पाहिजे.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, हे हत्यारी बऱ्याच ठिकाणी राहतात. या लोकांना हत्यार बाळगण्याची पोलिस डिपार्टमेन्टची परवानगी आहे का?

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, आपण हा विषय घेऊ या. माझ्या मते आपण हत्यार बाळगण्यासाठी पोलिस डिपार्टमेन्टची परवानगी देणार आहोत.

**मा. सभापती :-**

आपण हत्यारींना वर्ग करण्याचा विषय पास करुया.

**प्रेमनाथ पाटील :-**

जर त्या हत्यारीने काही लफडे केले तर उद्या त्याला कोण जबाबदार आहे?

**रतन पाटील :-**

संबंधित विभागाकडे तेवढी लायसन्स जमा झालेली आहेत का? पोलिसांकडून तशी परवानगी घेतलेली आहे का?

**मोहन पाटील :-**

आपण त्यांना परवाना धारकाशिवाय पगार देऊ शकत नाहीत.

**जयंत पाटील :-**

आम्हाला या गोष्टीची माहिती द्या.

**सुर्यकांत भोईर :-**

आम्हाला काहीच माहिती नाही.

**मा. आयुक्त :-**

या गोष्टीची माहिती दिलेली आहे.

**रतन पाटील :-**

त्या लोकांकडे परवाना उपलब्ध नाही असे आम्ही म्हणत नाही. त्या लोकांकडे परवाना उपलब्ध असेल. परंतु, त्यांच्याकडे किती परवाना आहे? किती जण आहेत? कारण माझ्या माहितीप्रमाणे ११४ हत्यारी नाहीत. जर ११४ हत्यारी असतील तर तुम्ही आम्हाला सांगा. त्यांच्याकडून बारा-बारा तास काम केले जाते. तिकडची लोक इकडे फिरवली जातात. इकडचे लोक तिकडे फिरवली जातात. अशा पध्दतीने सुरक्षारक्षक काम करतात.

**सुर्यकांत भोईर :-**

सुरक्षा रक्षकाची आठ तासाची ड्युटी असल्याचे लिहीतात आणि त्या सुरक्षा रक्षकाकडून बारा तास काम करुन घेतले जाते.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याकडून आठ तासाची ड्युटी करीत असल्याचे लिहून घेतात आणि त्या सुरक्षा रक्षकाची बारा तासाची ड्युटी असते.

**केशव घरत :-**

सुरक्षा रक्षक बारा तास ड्युटी करुनसुध्दा त्या सुरक्षा रक्षकांचे तीन पाळ्यांचे पैसे मस्टरवर लावले जातात.

**प्रेमनाथ पाटील :-**

मस्टरवर तीन पाळ्यांचे पैस लावले जातात.

**सुर्यकांत भोईर :-**

तीन पाळ्यांचे पैसे लावले जातात.

**प्रेमनाथ पाटील :-**

एक वर्कर फक्त एका ठिकाणी राहतो. त्या वर्करची दुसरीकडे बदली होत नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आपल्या महापालिकेत हत्यारी आणि बिना हत्यारी सुरक्षा रक्षणासाठी ठेकेदार निश्चित केलेला आहे. आपण त्या ठेकेदारामार्फत काम करुन घेतो. ठेकेदार सुरक्षा रक्षक निश्चित करताना जे हत्यार वापरायचे आहे ठेकेदार ते हत्यार वापरायला देताना विदाऊट परवानगी ते हत्यार वापरायला देऊ शकत नाही. ती त्याची लायबिलीटी आहे आम्ही ती लायबिलीटी असल्याची खात्री करु आणि तुम्हाला दोन दिवसांत कळवू.

**जयंत पाटील :-**

आपण अजूनपर्यंत खात्री करुन घेतलेली नाही असा याचा अर्थ झाला.

**प्रेमनाथ पाटील :-**

म्हणजे तुम्ही अजूनपर्यंत खात्री केलेली नाही.

**जयंत पाटील :-**

आपण त्यांना कुठल्या अटीशर्ती दिलेल्या आहेत ते सांगा.

**केशव घरत :-**

साहेब, आपण अटीशर्तीबाबत लिहून घेतलेले आहे का?

**रतन पाटील :-**

आपल्या महापालिकेत ११४ हत्यारी जमा आहेत का?

**जयंत पाटील :-**

आपल्याकडे ११४ हत्यारी आहेत का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आपण त्यांच्याकडून काम घेतलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

प्रथम आपल्याकडे ११४ हत्यारी आहेत का? ते सांगा.

**गजानन भोईर :-**

आपण हे ११४ हत्यारी देताना त्यांना काही अटीशर्ती लागू आहेत का?

**प्रभात पाटील :-**

मी या संदर्भात असे सांगू इच्छिते की, गेल्या आठवड्यात श्री. गणेश नाईक साहेबांनी 'ई' टी.व्ही.ला त्यांचा एक स्वतंत्र विषय दिलेला होता की, त्यांनी संपूर्ण एजन्सीची माहिती मागवलेली आहे. ही संपूर्ण एजन्सी बोगस आहे. ती लोक पन्नास लोकांची मान्यता घेतात आणि दोन-दान हजार लोकांना कामाला लावतात. या मुद्यावर चर्चा करण्यासाठी श्री. गणेश नाईक साहेब स्वतः टी.व्ही.वर मुलाखत देत होते. त्यांनी या एजन्सीची संपूर्ण माहिती मागवलेली आहे. मा. आमदार आणि मंत्र्यांची या विषयी साशंकता आहे.

**जयंत पाटील :-**

श्री. खतगावकर साहेब, आपल्याकडे ११४ हत्यारी आहेत का?

**मा. सभापती :-**

मी तुमच्या सर्व मतांशी सहमत आहे. आपण सध्या पुर्नविनियोजनाचा विषय पास करुया आणि आपण सुरक्षा रक्षकांचे पुरावे गोळा करुन सुरक्षा रक्षकाचा विषय नंतर घेऊया.

**सुर्यकांत भोईर :-**

हा विषय पुढे ढकला.

**प्रभात पाटील :-**

हा विषय पुढे ढकला.

**मा. सभापती :-**

आपण पुर्नविनियोजनाचा विषय पास करुया आणि सुरक्षा रक्षकाचा विषय पुढच्या मिटींगला घेऊया.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही हा विषय पुढच्या वेळेला घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा पुर्ननियोजनाचा प्रश्न आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याला ११४ हत्यारींना आणि १३० बिन हत्यारींना पगार द्यावा लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा विषय पुढे ढकलण्याचा प्रश्न येत नाही. हा पुर्ननियोजनाचा प्रश्न आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

परंतु, आपल्याला ११४ हत्यारी आणि १३० बिन हत्यारींना पगार द्यावा लागेल. त्याचे काय?

**मा. सभापती :-**

ह्या विषयावर सगळ्यांना बोलायला देऊ का? मलासुध्दा या विषयावर बोलता येईल. मा. आयुक्त साहेब, या ठिकाणी हा जो विषय आलेला आहे. मी तुमच्या मताशी सहमत आहे असे सांगितल्यावर प्रश्न येत नाही. मिरा भाईंदर शहरामध्ये एखादा रुम भाड्याने द्यायचा असेल तर पोलिस म्हणतात की, तुम्ही त्याचेसुध्दा नांव द्या. जर उद्या काय झाले तर तुम्ही त्याला जबाबदार रहाल. त्यांनी अशा प्रकारचा आक्षेप ठेवलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्या हत्यारींकडून लायसन्स वगैरे सगळे काही घ्या.

**गजानन भोईर :-**

तुम्ही जे म्हणता तेच आम्हाला म्हणायचे आहे.

**मा. सभापती :-**

ज्याअर्थी आपण या ठिकाणी एवढे रक्षक ठेवलेले आहेत. त्याचे सर्व ॲड्रेस तुमच्याकडे उपलब्ध हवेत. उद्या एखादा गुन्हा घडला तर आपणसुध्दा जबाबदार राहू.

**जयंत पाटील :-**

आम्हालासुध्दा तेच सांगायचे आहे. जर उद्या त्याने बाहेर गुन्हा केला तर त्याला कोण जाबाबदार आहे?

**मा. सभापती :-**

मी तुमच्या मताशी सहमत आहे. आपण त्यांना पगार देतो आणि आपल्या शाळेमध्ये रहायला जागासुध्दा देतो. हे सगळे आमच्या शाळेत राहिलेले होते. हा विषय चुकीचा आहे. म्हणून आपण त्याच्यावर कार्यवाही करुया.

**प्रेमनाथ पाटील :-**

ही खरी गोष्ट आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, दैनिकवाल्यांनी तक्रार केलेली होती. तेव्हा त्यांच्यावर धाड पडलेली होती.

**मा. सभापती :-**

आपण हा विषय घेऊया. परंतु, हा विषय पुर्नलोकनाचा आहे. कारण त्या सुरक्षा रक्षकांना दोन महिन्याचा पगार मिळालेला नाही.

**रतन पाटील :-**

जर त्या सुरक्षा रक्षकांना दोन महिन्याचा पगार मिळाला नसेल तर ठेकेदाराची बिले थांबवा.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्हाला एखाद्या लोकांना पेमेन्ट करायचे आहे तर एवढी लोक आहेत का? मग तुम्ही हा पुर्नलोकनाचा विषय का आणला? आम्ही तेवढे पुर्नलोकन कशाला करायचे? आम्ही तेवढे पैसे का वर्ग करायचे?

**केशव घरत :-**

पहिला प्रश्न ११४ हत्यारी आणि १३० बिन हत्यारी लोकांचा आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्हाला प्रशासनाने आयुक्त .......

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, मी तुमच्याशी बोलत नाही. तुम्ही सगळ्या विषयामध्ये हुषार आहात ते आम्हाला माहित आहे. पीठासीन अधिकारी या ठिकाणी बसलेले आहेत. मग तुम्ही सगळ्या गोष्टीमध्ये कशाला बोलता? माझा या गोष्टीला पुर्णपणे विरोध आहे. एवढे हत्यारी आहेत का? ते तुम्ही मला अगोदर सांगा. आमच्यासाठी हा महत्वाचा प्रश्न आहे. जर एवढे हत्यारी नसतील तर तुम्ही हे पैसे कुठे वर्ग करता? तुमच्या त्यांच्याबरोबर काय अटीशर्ती झालेल्या आहेत ते सांगा. आपण एक कल्पना करुया की, एखाद्या माणसाने नवघर शाळेवर गोळीबार केला तर तो गोळीबार करणारा माणूस चोर असेल हे तुम्ही कशावरुन सांगु शकता?

जर आपल्या हत्यारी बरोबर वैयक्तीक भानगड असेल आणि त्यांनी त्या ठिकाणी कोणाला गोळीबार करुन मारले तर ती कोणाची जबाबदारी आहे. ती जबाबदारी आमची आहे का? की ती जबाबदारी महापालिकेची आहे ते सांगा. त्याच्या अटीशर्ती काय ठेवलेल्या आहेत ते सांगा. जर आपण हत्यारीच्या अटीशर्ती ठेवल्या असतील तर आपल्याला हत्यारीची गरज कुठे-कुठे आहे? आपल्याला हत्यारीची नक्की गरज आहे का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ज्या वेळेला टेन्डर निघाले आपण त्यावेळेला मान्यता दिलेली आहे.

**जयंत पाटील :-**

त्याच्या अटीशर्ती काय आहेत?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

त्याच्या अटीशर्तीवर सर्वांच्या सह्या आहेत.

**जयंत पाटील :-**

११४ हत्यारी आहेत का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आपण ती अटसुध्दा घेऊ.

**जयंत पाटील :-**

तोपर्यंत हा विषय पुढे ढकला.

**गजानन भोईर :-**

११४ हत्यारी आहेत की नाहीत ते उपायुक्त साहेबांना माहित नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही ती माहिती गोळा करा.

**गजानन भोईर :-**

तुम्ही एखादा विषय आणताना अर्धवट का आणता?

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही त्या लोकांकडून बारा-बारा तास ड्युटी करुन घेतात आणि आठ तासाची ड्युटी असल्याचे रजिस्टरमध्ये लिहीतात.

**केशव घरत :-**

दुसरी गोष्ट म्हणजे आठ-आठ तासाच्या तीन पाळ्या असल्याचे दाखविले जाते.

**जयंत पाटील :-**

तुम्ही आमच्यासमोर ११४ हत्यारी हजर करा.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदय, आपल्याला कमिशनर साहेबांनी आता जी माहिती दिलेली आहे. ती माहिती खोटी होती का? असे मला प्रथम विचारायचे आहे. मी सभागृहाच्यावतीने मा. आयुक्त साहेबांना विचारु इच्छितो की, मा. आयुक्त साहेबांनी दिलेली माहिती खरी आहे की खोटी आहे ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

मी मघाशी सभागृहाला जी माहिती दिलेली होती ती सर्व माहिती खरी होती.

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांनी दिलेली माहिती खोटी आहे असे आमचे म्हणणे नाही.

**रतन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब खोटे बोलतात असे आम्ही बोलत नाही.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदय, मा. आयुक्त साहेबांनी दिलेली माहिती खरी असेल तर प्रश्न येत नाही. मा. आयुक्त साहेबांनी ही माहिती त्यांना असलेल्या माहितीप्रमाणे दिली असेल.

**रतन पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांनी दिलेली माहिती खोटी आहे असे आम्ही बोलत नाही. आम्ही फक्त त्या हत्यारीबाबत खुलासा मागत आहोत.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, या सभेमध्ये मा. आयुक्त साहेब प्रमुख नाहीत. या सभेमध्ये मा. पीठासीन अधिकारी प्रमुख आहेत. त्यामुळे पीठासीन अधिकारी त्यांचे मत मांडतील.

**मोहन पाटील :-**

मी मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो.

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, खरे बोलतात की खोटे बोलतात हा विषय या ठिकाणी येत नाही. तुम्ही ते नको तिथे ट्रान्सफर करु नका.

**मोहन पाटील :-**

मी हा विषय नको तिथे ट्रान्सफर करीत नाही. मा. आयुक्त साहेबांनी दिलेली माहिती खरी आहे की खोटी आहे याबाबत मी तुम्हाला तुमचे मत विचारत आहे. आणि मला तुमचे मत विचारण्यासाठी या ठिकाणी बोलावे लागत आहे.

**जयंत पाटील :-**

आमच्या मते ती माहिती चुकीची आहे. तुमच्याकडे ११४ हत्यारी आहेत.

**मोहन पाटील :-**

परंतु, आणखी १३० हत्यारींची आवश्यकता आहे.

**रतन पाटील :-**

अजुन १३० हत्यारी म्हणजे एकूण २४७ हत्यारी झाले. पुन्हा महापालिकेचे सुरक्षारक्षक किती आहेत? आणि कुठे कुठे आहेत? त्याचासुध्दा खुलासा होणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :-**

आपण हा विषय जास्त लांबवण्यापेक्षा इथे थांबवून पुढच्या मिटींगला घेऊया.

**मोहन पाटील :-**

हा विषय पुढच्या मिटींगला संपूर्ण माहितीसह आणा.

**गजानन भोईर :-**

या हत्यारींचे लायसन्स फोटो वगैरे सर्व महापालिकेमध्ये राहीले पाहिजे.

**रतन पाटील :-**

हत्यारींचे लायसन्स, पोलिसांच्या परवानग्या, सर्व फोटोग्राफ्स हे सर्व महानगरपालिकेमध्ये राहीले पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

या विषयाचा ठराव मांडलेला होता. त्याचे काय झाले?

**गजानन भोईर :-**

ठराव कोणी मांडला?

**प्र. सचिव :-**

या ठरावाला मंजुरी दिलेली नाही.

**मोहन पाटील :-**

ठराव झाल्यानंतर त्या ठरावाला मा. सभापती महोदयांनी मंजुरी द्यावी लागते. ती मंजुरी दिलेली नाही.

**प्रकरण क्र. १९४ :-**

सुरक्षा रक्षकाचे वेतन अदा करणेकरीता कमी पडत असलेली अंदाजपत्रकीय तरतुद पुर्नविनियोजन करुन भरुन काढणे बाबत.

**ठराव क्र. २०१ :-**

मा. सभापती सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १९५ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी ठरावाचे वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**केशव घरत :-**

साहेब, याच्यापुर्वी श्री. प्रविण पाटील यांचा जो ठराव आणलेला होता, त्या ठरावाचे काय झाले? विधी सल्लागार म्हणून रु. १०,०००/- च्या मानधनावर काम करायला श्री. प्रविण पाटील तयार होते. त्या ठरावाचे काय झाले?

**जयंत पाटील :-**

दि. १५/०२/१९९५ रोजी शासनाचा एक निर्णय झालेला होता. तो निर्णय श्री. प्रविण पाटील यांच्याशी संबंधित आहे. त्या निर्णयानुसार शासनाने रु. १०,०००/- पगार मान्य केलेला आहे. मग आता रु. २५,०००/- पगार का झाला?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण अर्ध्या दिवसाचे रु. २५,०००/- देत आहोत.

**जयंत पाटील :-**

तीन महिन्यामध्ये रु. २५,०००/- पगार कसा झाला?

**केशव घरत :-**

रु. २५,०००/- पगार कसा झाला?

**रतन पाटील :-**

रु. २५,०००/- पगार कशाला?

**मोहन पाटील :-**

आपण आवश्यकतेनुसार दिवस धरुन पगार सांगितलेला आहे. जर संपूर्ण दिवस विधी सल्लागाराने काम केले तर त्याला संपूर्ण दिवसाचा पगार दिला जाईल.

**केशव घरत :-**

परंतु, श्री. प्रविण पाटील यांचे काय झाले?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण प्रति दिन अर्धा दिवस अशाप्रकारे पगार देण्याचे ठरविलेले होते.

**गजानन भोईर :-**

आपण संपूर्ण दिवसाचे रु. १०,०००/- देत होतो. मग आता अर्ध्या दिवसाचे रु. २५,०००/- का द्यायचे?

**रतन पाटील :-**

आपल्याला विधी सल्लागार म्हणून रिटायर जजची आवश्यकता होती. आपण त्यावेळेला रिटायर जजची आवश्यकता असल्याचे लिहलेले आहे. मग तुम्ही असे विधी सल्लागार का नेमता? आणि तुम्ही अशा विधी सल्लागाराला रु. २५,०००/- देणे योग्य नाही. तुम्ही मागच्या वेळेला गोषवारा दिलेला होता त्या गोषवा-यापैकी एका गोषवा-यामध्ये रु. १०,०००/- चे मानधन लिहलेले होते. आणि दुस-या गोषवा-यामध्ये रु. २५,०००/- चे मानधन लिहलेले होते. आम्ही त्या दोन गोषवा-यापैकी कुठला गोषवारा सत्य मानायचा ते सांगा?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, या ठिकाणी क्लिअरकट असे लिहीलेले आहे की, स्थायी समिती सभा दि. ११/१०/२००५ रोजी प्रकरण क्र. १९१ अन्वये प्रस्ताव ठेवण्यात आलेला होता. त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पेपरमध्ये जाहिर नोटीस देऊन देकार मागविण्यात आलेले होते. त्याच्या अनुषंगाने दोन देकार आलेले आहेत. त्यांनी त्याच्यामध्ये रु. २५,०००/- किंवा रु. १०,०००/- किंवा रु. ५०,०००/- मांडा. ते देकार त्यांनीच दिलेले आहेत. मग प्रश्न विचारण्याची गरज नाही. ह्याच्यामध्ये क्लिअरकट देकार दिलेले आहेत. आपण असा ठराव काढलेला आहे की तुम्ही प्रथम जाहिर नोटिस काढा, टेन्डर काढा. नंतर देकार मागवा.

**प्रभात पाटील :-**

याचा अर्थ टेन्डर मागवून देकार आलेले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

टेन्डर मागवूनच देकार आलेले आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याला ह्यांनी टेन्डरसाठी लाख रुपयाची मागणी केली तर त्यांना लाख रुपये द्यायचे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

किती रुपये द्यायचे? ते तुम्ही ठरवा.

**जयंत पाटील :-**

शासनाचा निर्णय रु. १०,०००/- चा आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्याच्यामध्ये देकार मागविलेले आहेत. असे क्लिअरकट लिहलेले आहे.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, या ठिकाणी दोन गोषवा-यांवर दोन वेगवेगळ्या अमाउन्ट टाकलेल्या आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

शासनाचा निर्णय रु. १०,०००/- द्यायचा आहे. परंतु, आपण अर्ध्या दिवसाचे रु. २५,०००/- देत आहोत.

**गजानन भोईर :-**

साहेब, हा विषय पेपर नोटिस देण्यासाठी पुढे ढकलला होता की पगार वाढीसाठी पुढे ढकलला होता?

**जयंत पाटील :-**

हा विषय फक्त पेपर नोटीस पब्लिश करण्यासाठी पुढे ढकलला होता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पेपर नोटीस पब्लिश झालेली आहे.

**गजानन भोईर :-**

पेपर नोटीस कधी पब्लिश झालेली आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पेपर नोटीस पब्लिश झालेली आहे. तुम्हाला गोषवारा दिलेला आहे. तुम्हाला सांगायची गरज नाही. तुम्ही गोषवारा वाचा.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेब, या ठिकाणी विधी सल्लागाराची मुदत दिलेली नाही. माझ्या मते तुम्ही त्यांना सहा महिन्याची मुदत द्यावी.

**प्रेमनाथ पाटील :-**

सहा महिन्याची मुदत काय? तुम्ही वर्षाची मुदत द्या. परंतु, तुम्ही त्यांना अर्ध्या दिवसासाठी रु. २५,०००/- का देता?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही रु. १५,०००/- ठरवा.

**रतन पाटील :-**

आम्ही कुठला गोषवारा योग्य मानायचा ते सांगा?

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, ह्याच्यामध्ये रु. १०,०००/- पेक्षा जास्त पगार देऊ शकत नाही. मग तुम्ही त्या विधी सल्लागारांना रु. २५,०००/- का देता?

**मा. सभापती :-**

आपण त्यांचा पगार ठरवूया.

**जयंत पाटील :-**

तो शासनाचा निर्णय असल्यामुळे आपण विधी सल्लागाराचा पगार ठरवू शकत नाही.

**रतन पाटील :-**

आपण विधी सल्लागारांना रु. १०,०००/- पेक्षा जास्त पगार देऊ शकत नाही.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो की, पूर्वीचे जे विधी सल्लागार होते, त्यांचा पगार रु. १०,०००/- होता आणि त्या विधी सल्लागारांना गाडीची सुविधा होती. परंतु, ह्या विधी सल्लागाराकडे गाडीची सुविधा नाही.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, तुम्ही विषय दुसरीकडे घेऊन जाऊ नका. शासनाचा सन १९९५ चा निर्णय आहे. तुम्ही त्या निर्णयाला चॅलेंज करता का?

**रतन पाटील :-**

शासनाचे निर्देश रु. १०,०००/- पगार देण्याचे आहेत.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, तुम्ही ठराव वाचला का?

**रमेश जैन :-**

इस ठरावमे गाडी वगैरा कुछभी मेन्शन नही किया है।

**मोहन पाटील :-**

पिछले विधी सल्लागारको गाडी दी थी।

**केशव घरत :-**

त्याच्यानंतर श्री. प्रविण पाटील यांचा प्रस्ताव आलेला होता.

**गजानन भोईर :-**

तुम्ही मला या ठिकाणी एक गोष्ट सांगा की, आपल्याकडे गेले सहा महिने विधी सल्लागार नव्हते. तेव्हा आपल्या नगरपालिकेला किती रुपयाचा तोटा झाला?

**केशव घरत :-**

विधी सल्लागार असल्यावर किती फायदा होतो? तेसुध्दा सांगा.

**रतन पाटील :-**

उलट, आपला फायदा झालेला आहे. आपले पैसे वाचलेले आहेत.

**गजानन भोईर :-**

आपल्याकडे विधी सल्लागार नव्हते. म्हणून आपला तोटा झालेला नाही.

**मोहन पाटील :-**

आपण यासाठी विधी समिती स्थापन करणार आहेत. प्रकरण क्र. १९५ विधी सल्लागाराची नेमणूक करणे. बाबतचा ठराव मी मांडलेला आहे. त्या सदरहू ठरावामध्ये विधी सल्लागाराची रु. २५,०००/-

पगाराऐवजी रु. १०,०००/- पगार करण्याची मी दुरुस्ती करीत आहे. विधी सल्लागाराला रु. १०,०००/- दरमहा मानधन देण्यात यावे अशी मी दुरुस्ती करीत आहे.

**एस. ए. खान :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**गजानन भोईर :-**

तुम्ही महानगरपालिकेचा फायदा केलेला आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही त्या विधी सल्लागाराला गाडी देणार आहात का?

**केशव घरत :-**

त्या विधी सल्लागारांना गाडी का द्यायची?

**मोहन पाटील :-**

पूर्वीच्या विधी सल्लागारांना गाडी होती. त्यामुळे आताच्या विधी सल्लागारांनासुध्दा गाडी द्यावी लागेल.

**रतन पाटील :-**

ते विधी सल्लागार कुठे राहतात?

**गजानन भोईर :-**

जो अधिकारी पालिकेमध्ये संपूर्ण दिवस काम करतो आपण त्या अधिकाऱ्याला गाडी देतो. परंतु, हे विधी सल्लागार चार तास येणार. त्यांना गाडी देणे योग्य नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, ते विधी सल्लागार अर्धा दिवस काय काम करणार आहेत? आता त्याला गाडीची गरज नाही.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती साहेब, पूर्वीचे विधी सल्लागार अर्धा दिवस काम न करता पूर्ण वेळ काम करायचे. ते अर्धा दिवस नव्हते.

**रतन पाटील :-**

त्या विधी सल्लागारांनी काय दिवे लावले ते आपल्याला माहित आहे. म्हणून त्या विधी सल्लागारांना जावे लागले.

**प्रेमनाथ पाटील :-**

सचिव साहेब, आता जो ठराव झाला, त्याच्यामध्ये त्या विधी सल्लागाराला गाडी न देता रु. १०,०००/- मानधन द्यायचे याची नोंद करुन घ्या.

**मा. सभापती :-**

आपण गाडी देण्याबाबत नंतर ठरवूया.

**केशव घरत :-**

नंतर नका ठरवू. आताच ठरवूया.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही नंतर कशाला ठरवता? आताच ठरवा.

**जयंत पाटील :-**

ही नेमणुक किती महिन्यासाठी आहे? ते सांगा.

**मा. सभापती :-**

ह्या विधी सल्लागारांनी मंत्रालयाच्या कक्षात काम केलेले होते. ते तिथे सल्लागार होते.

**केशव घरत :-**

साहेब, आपल्याकडे पूर्वीचे विधी सल्लागार रिटायर जज होते आणि त्यांनी कोर्टात काम केलेले होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याला रिटायर जजची आवश्यकता आहे.

**जयंत पाटील :-**

या विधी सल्लागाराची मुदत सहा महिन्यापर्यंत असावी. तुम्ही ५३(१) वाचा. तुम्हाला त्याच्या अनुषंगाने या विधी सल्लागाराला सहा महिन्यापर्यंत ठेवावे लागेल.

**रतन पाटील :-**

५३(१) मध्ये विधी सल्लागाराच्या पगाराबाबत नमुद केलेले नाही.

**जयंत पाटील :-**

५३(१) मध्ये विधी सल्लागाराची मुदत सहा महिन्याची दिलेली आहे.

**रतन पाटील :-**

५३(१) मध्ये विधी सल्लागााची मुदत सहा महिने दिलेली आहे हे बरोबर आहे.

**जयंत पाटील :-**

मग विधी सल्लागाराची मुदत एक वर्षाची द्यायची असे तुम्ही का म्हणता?

**रतन पाटील :-**

माझे म्हणणे असे आहे की ५३(१) मध्ये विधी सल्लागाराला रु. २५,०००/- पगार देण्याचे नमुद केलेले नाही.

**जयंत पाटील :-**

हा विषय महासभेत आणून विधी सल्लागाराची मुदत वाढवावी लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, तुम्ही तुमची सुचना मांडा. परंतु, माझे असे म्हणणे आहे की, आपण विधी सल्लागाराला रु. १०,०००/- पगार ठेवला तर तो रोज मुंबईहून भाईंदरला येताना त्याला रु. ३००/- किंवा रु. ४००/- पेट्रोलचा खर्च होणार आहे. तो खर्च त्याला परवडणार नाही.

**जयंत पाटील :-**

असे असेल तर श्री. प्रविण पाटील यांना घ्या.

**प्रकरण क्र. १९५ :-**

विधी सल्लागाराची मानधनावर नेमणुक करण्याबाबत.

**ठराव क्र. २०२ :-**

महानगरपालिका आस्थापनेवर विधी सल्लागाराची नेमणूक करणेबाबत मा. स्थायी समिती सभा दि. ११/१०/२००५ रोजी प्रकरण क्र. १९१ अन्वये प्रस्ताव ठेवण्यात आला होता. प्रस्ताव मंजूरीनुसार पेपरमध्ये जाहिर नोटिस देऊन देकार मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने १) श्री. विवेक जी. कडू, २) श्री. डी. एस. सपकाळे यांनी संपूर्ण तपशिलासह त्यंची माहिती सादर केलेली आहे. या दोन अर्जदारांच्या कामाची, अनुभवाची, शैक्षणिक पात्रता यांची तुलना करता श्री. डी. एस. सपकाळे यांच्याकडे महानगरपालिकेस अपेक्षित असलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव असून ते सेवानिवृत्त, उप-सचिव, (विधी विषयक) सरकारी अधिकारी होते.

महानगरपालिकेचा विधी विभाग सांभाळणे करीता विधी विषयक तज्ञ नेमणे अत्यंत आवश्यक असून न्यायालयीन प्रकरणे मार्गी लावणे, प्रलंबित न्यायालयीन दाव्यामध्ये आवश्यक ती पूर्तता करुन महानगरपालिकेच्या बाजूने निकाल लावून घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे ह्याबाबी अत्यावश्यक झालेल्या आहेत. त्यामुळे महानगरपालिकेस अपेक्षित शैक्षणिक पात्रता धार करीत असलेल्या श्री. डी. एस. सपकाळे या निविदा धारकास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) नुसार रु. १०,०००/- दरमहा मानधनावर विधी सल्लागार म्हणून त्यांनी प्रतिदिन अर्धा दिवस महानगरपालिका कार्यालयात उपस्थित राहून काही महत्त्वाच्या तसेच अन्य कार्यालयीन तातडीच्या कामकाजाच्या वेळी पूर्ण वेळ महानगरपालिकेच्या कार्यालयात उपस्थित राहून कायदे विषयक सल्ला देण्याच्या अटीचे अधिन राहून नियुक्तीस मंजूरी देण्यात येत असून येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येते. सदरची नेमणूक सहा महिन्याकरिता करावी.

**सुचक :- श्री. मोहन म. पाटील.** **अनुमोदन :- श्री. एस्. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १९६ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**केशव घरत :-**

साहेब, यापुर्वी सिस्टिम मॅनेजर म्हणून श्री. माशाळकर यांनी काम केलेले आहे. त्यांना किती पगार होता?

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. माशाळकर यांना गाडी उपलब्ध होती.

**मा. सभापती :-**

आपल्याकडे असणाऱ्या मास्टर लोकांना गाडी द्यावी लागते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही विधी सल्लागारांना रु. १०,०००/- देता मग ह्या तांत्रिक सल्लागारांना रु. १५,०००/- का देता?

**मा. सभापती :-**

त्यावेळच्या विधी सल्लागाराला त्यावेळी ठरल्याप्रमाणे रु. १०,०००/- दिलेले आहेत. ते आता विचारण्यात काहीही अर्थ नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या तांत्रिक सल्लागारालासुद्धा रु. १०,०००/- देणार का?

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपण जाहिरात मागवून जे काही सांगितलेले आहे म्हणजे कलम ५३ अन्वये मा. आयुक्तसाहेबांनी सहा महिन्यासाठी मुदत द्यायची त्याचा खुलासा करा.

**मिलन पाटील :-**

महानगरपालिकेचा विधी सल्लागार क्वालिफाईड पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्हाला क्वालिफाईड म्हणून पाहिजे मग विधी सल्लागार क्वालिफाईड नाही का? आपण विधी सल्लागाराचा पगार रु. २५,०००/- वरुन १०,०००/- वर आणलेला आहे. मग सिस्टिम मॅनेजर रू. ९०००/- वर यायला पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्हाला हे संयुक्तिक वाटते का?

**मा. सभापती :-**

हा विषय मंजुर आहे.

**प्रकरण क्र. १९६ :-**

संगणक विभागाकरिता तांत्रिक सल्लागार नेमणेबाबत.

**ठराव क्र. २०३ :-**

महानगरपालिकेच्या कामाचा वाढता व्याप लक्षात घेता, नागरीकांना चांगल्या सेवासुविधा पुरविणे व उपलब्ध करुन देण्याकरीता संगणक विभाग निर्माण केलेला आहे व त्या विभागासाठी आवश्यक असलेली पदे १) सिस्टीम मॅनेजर, १ पद, २) सिस्टीम ॲनेलिस्ट, १ पद, ३) प्रोग्रामर, १ पद, ४) संगणक यंत्र चालक, १८ पदे नव्याने निर्माण करण्यास मा. महासभा दि. ५/६/२००५ ठराव क्र. १४ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली अहे. त्या अनुषंगाने प्रस्ताव मा. सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे जा.क. मनपा/आस्था/१०९/१६८२/२००४-०५, दि. १३/०७/२००४ अन्वये पाठविण्यात आलेला आहे. परंतु, शासनाकडून आजतागायत कोणत्याही प्रकारची मंजूरी आलेली नाही.

महानगरपालिकेने संगणकीकृत नागरी सेवा सुविधा केंद्र सुरु केलेले असून त्या संगणक विभागाकरिता संगणकाचे उच्च तांत्रिक ज्ञान असलेले सक्षम अधिकारी, यांची आवश्यक असलेली निकड व सदर पदांची महानगरपालिकेच्या दैनंदिन कामकाजाकरिता असलेली जरुरी तसेच कामात येत असलेल्या अडचणी लक्षात घेता शासनाकडून संगणक तंत्रज्ञान असलेली पदे मंजूर होऊन येईपर्यंत तातडीची उपाययोजना म्हणून किमान सिस्टी मॅनेजर हे १ पद रु. १५,०००/- प्रति महिना या ठोक वेतनावर वृत्तपत्रात जाहिर निविदा मागवून सहा महिन्याकरिता भरण्यांस मंजूरी देण्यांत येत असून येणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकिय मान्यता देण्यांत येते.

**सुचक :- श्री. मिलन पाटील.** **अनुमोदन :- श्री. एस्. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १९७ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

सदर ठराव मांडण्यापुर्वी या विषयावर चर्चा झाली पाहिजे. तुम्ही ठराव करुन नंतर चर्चा मांडू नका. या विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे कारण हा विषय आर्थिक मंजुरीचा आहे.

**मा. सभापती :-**

प्रथम ठरावाचे वाचन झाले पाहिजे.

**रतन पाटील :-**

ठराव झाल्यानंतर चर्चा नको ठरावापुर्वी चर्चा करा.

**प्रभात पाटील :-**

आपल्याला ठराव मांडावा लागेल.

**मोहन पाटील :-**

प्रथम ठराव मांडायचा आणि नंतर चर्चा करायची.

**रतन पाटील :-**

आतापर्यंत तसेच चाललेले आहे. मी या ठरावासंदर्भात मा. सभापतीसाहेबांकडे विनंती करतो की ठराव मांडण्यापुर्वी चर्चा करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हा ठराव फेटाळला गेला तर काय करायचे?

**मिलन पाटील :-**

आपण मागच्या वेळेला सफाई कामगार परमनन्ट केलेले होते. ते १९९३ पासुन म्हणजे स्थायी समितीने दि. २३/०३/२००४ चा ठराव पास केलेला होता. त्या लोकांना मानधन वेतनवाढ किंवा शिफारस दिलेली नाही. याच्यामध्ये न्यायालयीन मॅटर आहे का? मी न्यायालयाचा अपमान करित नाही. त्यांना न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे आदेशपत्र द्यावे लागेल. परंतु, तुम्ही सफाई कामगारांवर अन्याय कशाला करता? तुम्ही सफाई कामगारांच्या पदोन्नतीचे काम खितपत का ठेवलेले आहे? तुम्ही श्रीम. मोघे सोबत सफाई कामगारांच्या पदोन्नतीचेसुद्धा काम करा. सफाई कामगारांनासुद्धा न्याय मिळायला पाहिजे जे ५३८ कामगार आहेत त्यांनासुद्धा न्याय द्या.

**केशव घरत :-**

साहेब, न्यायालयाचा काय निर्णय आहे? तो सांगा.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील यांचे म्हणणे बरोबर आहे. तुम्ही या विषयावर ठराव मांडा. परंतु, त्याच्यावर असलेले जे कर्मचारी आहेत. त्यांची नगरपालिकेपासुन महानगरपालिकेच्या वेतनश्रेणी जो प्रश्न आहे. ती एक वेतनश्रेणी आहे आणि ५३८ कामगारांना ती वेतनश्रेणी लागू झाली पाहिजे अशापद्धतीची आपल्या लोकांची धारणा आहे. आजपर्यंत कोणत्याही कर्मचारी, कामगार, अधिकारी वर्ग आणि पदाधिकारी यांना नगरसेवकांनी कधीही विरोध केलेला नाही. त्यांना प्रत्येक वेळेला सहकार्य केलेले आहे. म्हणून आमची सर्वांची अशी धारणा आहे की तुम्ही तो विषय लवकरात लवकर आणायला पाहिजेत. आपण त्यांनासुद्धा वेतनश्रेणी लागु केली पाहिजे.

**मिलन पाटील :-**

स्थायी समितीने दि. २४/०३/२००४ रोजी ठरावसुद्धा पाठविलेला होता.

**मोहन पाटील :-**

आपल्याला कोर्टाने एक केस दिली. आपण ती केस पुढे आणली. परंतु, आपण समोरुन केससुद्धा आणू शकतो.

**रतन पाटील :-**

तसा विषय नाही. तुम्ही वेगळीकडे विषय नेउ नका.

**केशव घरत :-**

न्यायालयाने दिलेला निर्णय वेगळा आहे आणि गोषवा-यामध्ये वेगळा निर्णय आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

जे कर्मचारी सफाई कामगार म्हणून लागलेले होते त्यांचा उल्लेख लिपिकमध्ये कसा केलेला आहे? ते सांगा.

**केशव घरत :-**

त्या लोकांना सफाई कामगार म्हणून कायम करण्यात यावे असा न्यायालयाने निर्णय दिलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

गोषवा-यामध्ये लिपिक म्हणून निर्णय दिलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, न्यायालयाच्या निर्णयाची प्रत मागवा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

आमच्याकडे न्यायालयाच्या निर्णयाची प्रत उपलब्ध आहे.

**गजानन भोईर :-**

न्यायालयाने काय ऑर्डर दिलेली आहे ते आम्हाला समजु दे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

न्यायालयाच्या निर्णयाची प्रत वाचून दाखवा.

**जयंत पाटील :-**

आपण न्यायालयात विरोधात होतो का?

**रतन पाटील :-**

आपण विरोधात गेलेलो नाही.

**जयंत पाटील :-**

हा निकाल आपल्या विरोधात आलेला आहे का?

**मिलन पाटील :-**

न्यायालयाच्या निर्णयाची प्रत दाव्यासहित वाचुन दाखवा.

**जयंत पाटील :-**

आपले त्याठिकाणी कोण वकिल होते? ते सांगा.

**रतन पाटील :-**

आपण अपिल केलेला नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण विधी सल्लागार नेमतो. माझा बोलण्याचा उद्देश असा आहे की आपले वकिल काय करतात?

**गोविंद परब :-**

दावा क्र. ८३-२००३ ही ऑर्डर आहे.

(ऑर्डरचे वाचन केले.)

**केशव घरत :-**

इथे सफाई कामगारांच्या पदांचे दिलेले आहे. परंतु, लिपिकचे कुठे आहे?

**रतन पाटील :-**

सन १९९३ पासुन प्रश्नाला सुरूवात होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही सफाई कामगारांना लिपिकची पोस्ट कशी देतात?

**केशव घरत :-**

तुम्ही सफाई कामगारांचा उल्लेख करण्याऐवजी लिपिकचा उल्लेख का करता?

**रतन पाटील :-**

साहेब, ह्याचा प्रश्नाला सन १९९३ पासुन सुरवात झालेली आहे.

**जयंत पाटील :-**

तिकडे परमनंन्ट एम्प्लॉइज लिहिलेले आहे आणि इकडे कर्मचारी रोजंदारीवर होते असे लिहिलेले आहे. तुमच्या ऑर्डरमध्ये परमनंन्ट एम्प्लॉइज असा उल्लेख केलेला आहे. त्याचा खुलासा द्या.

**गोविंद परब :-**

या ठिकाणी परमनंन्ट करा असे म्हणणे आहे.

**केशव घरत :-**

त्या कर्मचाऱ्यांना लिपिक म्हणून परमनंन्ट करायचे असे लिहिलेले आहे का?

**गोविंद परब :-**

होय.

**केशव घरत :-**

आता जे ५३८ सफाई कामगार होते. त्यांना लिपिक का केलेले नाही? तुम्ही प्रथम ५३८ सफाई कामगारांना लिपिकची पोस्ट देण्याचा विचार करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मग त्या सफाई कामगारांनीसुद्धा कोर्टात जायला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

ही लिपिकची पोस्ट भरण्यासाठी प्रथम तुम्ही सफाई कामगारांचा प्राधान्याने विचार करा. तुम्ही श्रीम. मोघे यांना ऑर्डर दिल्यापासुन परमनंन्ट करणार की, कधीपासुन परमनंन्ट करणार ते सांगा.

**मा. सभापती :-**

मी सर्व सन्मा. सदस्यांना सांगू इच्छितो की, ह्यांना शासनाची मंजुरी आहे. त्यामुळे आपल्यालासुद्धा मंजुरी द्यावी लागेल.

**केशव घरत :-**

मग त्या कर्मचाऱ्यांनी कोर्टात जावे का? जर तसे असेल तर ५३८ सफाई कामगारसुद्धा कोर्टात जातील.

**सुर्यकांत भोईर :-**

५३८ कर्मचाऱ्यांनी कोर्टात जावे का?

**गजानन भोईर :-**

मग सगळे ५३८ सफाई कामगारसुद्धा कोर्टात जातील.

**सुर्यकांत भोईर :-**

५३८ कर्मचारी कोर्टात जातील.

**जयंत पाटील :-**

श्रीम. मोघे यांना लिपीकच बनवा अशी ते ऑर्डर कशी करू शकतात?

**गजानन भोईर :-**

५३८ कर्मचाऱ्यांनासूद्धा कोर्टात जाउ दे.

**जयंत पाटील :-**

जर श्रीम. मोघे सफाई कामगार आणि रोजदारी कामगार असतील तर त्यांना लिपिक पदावर घ्या आम्हाला असा आदेश कोर्ट देउ शकत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्यांनी कोर्टाची दिशाभुल केली असेल.

**जयंत पाटील :-**

जर समजा सफाई कामगारांना आयुक्त म्हणून घ्या असा कोर्टाने आदेश दिल्यावर आपण त्यांना मा. आयुक्तांच्या पदावर घेउ शकतो का?

**गजानान भोईर :-**

त्या लिपिक आहेत का?

**ज्युडी डिसोजा :-**

झाडू मारणाऱ्या कामगाराला लिपिक म्हणून कसे घेणार?

**ग्रिटा फॅरो :-**

पात्रतेप्रमाणे पद द्या. प्रथम त्यांची पात्रता बघा.

**जयंत पाटील :-**

जर श्रीम. मोघे सफाई कामगार म्हणून कार्यरत असल्या तरी त्यांना लिपिक म्हणून घ्या असा कोर्टाने आदेश दिलेला आहे का? जर त्या सफाई कामगार होत्या तर त्यांना लिपिक म्हणून घ्या असा कोर्ट आदेश कसा देणार?

**मा. सभापती :-**

त्या लिपिक म्हणून काम करित होत्या.

**जयंत पाटील :-**

त्या महिला कर्मचारी रोजंदारीवर सफाई कामगार म्हणून काम करित होत्या का?

**केशव घरत :-**

त्या महिला सफाई कामगार म्हणून रोजंदारीवर काम करित होत्या असे या गोषवाऱ्यामध्ये दिलेले आहे.

**जयंत पाटील :-**

तुमच्या ह्याच्यामध्ये सफाई कामगार म्हणून काम करित होत्या.

**गोविंद परब :-**

त्यांना सुरूवातीला महानगरपालिकेत सफाई कामगाराचे वेतन दिले जात होते.

**रतन पाटील :-**

शासनाचे सन १९९३ पासुन असे निर्देश काढलेले आहेत की सन १९९३ नंतर सफाई कामगार ठेवू नयेत असे असतानासुद्धा तुम्ही श्रीम. मोघे यांना सन १९९६ ला रोजंदारीवर घेतले. मग तुम्ही शासनाचे आदेश पाळले का? तुम्ही श्रीम. मोघे यांना कामावर कधी घेतले ती तारिख बघा आणि कामावर कधी घेतले ते मला सांगा. सन १९९३ चे शासनाचे निर्देश आहेत. तुम्ही शासनाच्या निर्देशाचे उल्लंघन केलेले आहे. हा एक मोठा गुन्हा आहे.

**मा. आयुक्त :-**

श्रीम. मोघे यांचे नाव ५३८ सफाई कामगारांमधील आहे का?

**रतन पाटील :-**

साहेब ह्यांचे नाव ५३८ कर्मचाऱ्यांमधील नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, ह्यांचे नाव चुकुन राहीलेले आहे. सन १९९३ मध्ये सफाई कामगार रोजंदारीवर घेतले आणि श्रीम. मोघे या सफाई कामगार म्हणून रोजंदारीवर काम करण्यासाठी सन १९९६ साली आलेल्या आहेत.

**रतन पाटील :-**

सन १९९३ अखेरीस सफाई कामगार घेतले. त्याच्यानंतर श्रीम. मोघे आलेल्या आहेत. नंतर शासनाने निर्देश काढले की सन १९९३ नंतर कुठलाही रोजंदारी कर्मचारी नगरपालिकेत घेउ नये. श्रीम. मोघे यांची नेमणूक सन १९९६ मध्ये झालेली आहे. मग तुम्ही शासनाचे निर्देश पाळलेले आहेत का? असे असतानासुद्धा श्रीम. मोघे कुठे काम करत होत्या. श्रीम. मोघे नगरपालिकेत काम करित होत्या, महानगरपालिकेत काम करित होत्या की जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये काम करित होत्या. याचा सुद्धा गोषवारा इथे यायला पाहिजे होता. तुम्ही इथे तो गोषवारा दिलेला नाही. तुम्ही आमची दिशाभुल करित आहात. तुम्ही आम्हाला फक्त

कोर्टाचे आदेश दाखविता हे योग्य नाही. ही केस कोर्टात गेल्यानंतर तिथे महापालिकेचे वकील कोण होते? यांच्या जोडीला कुठले अधिकारी होते. तुम्ही अपिलात का गेले नाही हे याठिकाणी दिलेले आहे का? तुम्ही अपिलात का गेले नाही? महापालिकेचे जे लाखो रुपयाचे नुकसान आहे. ते कोण भरून काढणार? कुठले अधिकारी हे नुकसान भरुन काढणार? या नुकसानाची भरपाई वकिल भरुन देणार आहे का? आम्ही हे सर्व नोकरीसाठी बोलत नाही. बाकीच्या अटीशर्ती आणि शपथपत्र लिहून देत असेल तर आम्ही त्याला मान्यता देउ. परंतु, आम्ही महापालिकेचे एक पैशाचे नुकसान होउ देणार नाही. श्रीम. मोघे कुठे होत्या? जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये होत्या की दुसरीकडे कुठे काम करित होत्या? ते तुम्ही आम्हाला सांगा त्यांना पगार कुठून जात होता हे सर्व आम्हाला सांगा. आम्हाला याची सविस्तर माहिती कळू द्या.

**जयंत पाटील :-**

श्रीम. मोघे, कोर्टात केस चालु असताना सर्व्हिस कशी करू शकतात?

**मा. आयुक्त :-**

श्रीम. मोघे कार्यरत होत्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. देहेरकर कलेक्टर म्हणून कार्यरत होते.

**जयंत पाटील :-**

श्रीम. मोघे यांना कोर्टात केस चालू असताना मा. आयुक्त साहेबांकडे सर्व्हिस करतात हे योग्य आहे का?

**रतन पाटील :-**

तिथे कोर्ट मॅटर होत असताना आपण इकडेसूद्धा बघायचे का?

**जयंत पाटील :-**

कोर्टामध्ये केस चालू असताना श्रीम. मोघे जिल्हाधिकाऱ्यांकडे सर्व्हिसला होत्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

श्रीम. मोघे यांना पगार इथुनच द्यायचा.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्रीम. मोघे या जिल्ह्याधिकाऱ्याकडे काम करतात आणि त्यांना इथून पगार देणे योग्य आहे का?

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करित आहात.

**जयंत पाटील :-**

श्रीम. मोघे काम करु शकत नाही.

**मा. आयुक्त :-**

मी सर्व सन्मा. सदस्यांच्या माहितीसाठी सांगतो की श्रीम. मोघे सन १९९३ पासुन कार्यरत होत्या. तुमच्यामते त्या सन १९९६ मध्ये कार्यरत असतील जर तेव्हाच्या अधिकाऱ्यांनी किंवा जिल्हाधिकाऱ्यांनी त्याची सेवा नगरपालिका कार्यालयाकडे तात्पुरत्या स्वरुपात वर्ग केलेला असेल तर आपल्याच महापालिकेतुन कर्मचारी तिकडे गेले अशातला भाग नाही. त्या ठिकाणी भिवंडीवरूनसुद्धा कर्मचारी काम करित होते, अंबरनाथवरुनसुद्धा कमर्चारी काम करित होते. कर्मचारी काम करित नव्हते अशातला भाग नाही. तो त्यांना चांगल्या रितीने सक्षम करायचा होता. म्हणून त्यांनी आपल्याकडे सेवा मागवून घेतलेल्या होत्या आणि प्रत्येक नगरपालिकेने सेवा दिलेल्या होत्या.

**केशव घरत :-**

साहेब, सफाई कामगाराला लिपिक म्हणून कसे घेणार?

**रतन पाटील :-**

आता नगरपालिकेमध्ये जे सफाई कामगार आहेत. त्यांना कायमस्वरूपी करण्याबाबत सन २००० मध्ये निकाल लागलेला आहे. मग सन २००० ते सन २००३ पर्यंत श्रीम. मोघे कुठे होत्या? त्या कोर्टात का गेल्या नाहीत. त्यांनी हा तीन वर्षाचा कालावधी का घेतला? त्या या तीन वर्षाच्या कालावधीमध्ये कुठे काम करित होत्या.

**जयंत पाटील :-**

श्रीम. मोघे जिल्हाधिकाऱ्यांकडे कामाला होत्या असे सांगितले जाते.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी याबद्दल असे सांगेन की, सन्मा. सदस्य मिलन पाटील यांच्यापासुन ५३८ कर्मचाऱ्यांची सुरूवात झाली. तेव्हापासुन मी बोलण्याचा प्रयत्न करित होतो. परंतु, सभागृहामध्ये प्रत्येक सन्मा. सदस्यांच्या या बाबतीत वेगळ्या भावना ऐकायला आलेल्या आहेत. परंतु, मी त्याबाबतीत सभागृहाला असे आश्वासन देउ इच्छितो की, ५३८ कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जो काही ठराव झालेला असेल किंवा महापालिकेने जो काही निर्णय घेतलेला असेल मी त्याची खात्री आठवडाभरात करतो. जर त्यांचा हक्क असेल तर त्यांना त्या नियमात बसविले जाईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपल्याकडे त्यावेळेला श्री. राउत मुख्याधिकारी होते.

**गजानन भोईर :-**

५३८ कर्मचाऱ्यांमधील एखादा कर्मचारी कोर्टात गेला तर तो काहीही सांगेल. जर कोर्टाने त्याला उपायुक्त बनवावे असे सांगितले तर त्या कर्मचाऱ्याची पात्रता आहे की नाही ते बघितली पाहिजे. आपले वकिल तिकडे काय भांडत होते.

**रतन पाटील :-**

आपल्या वकिलांनी आपल्याला काय दिलेले आहे? आपले वकिल तिकडे का गेले नाहीत.

**सुर्यकांत भोईर :-**

श्रीम. मोघे यांचे शिक्षण किती आहे?

**जयंत पाटील :-**

श्रीम. मोघे यांना सफाई कामगार म्हणून घ्यायचे की लिपिक म्हणून घ्यायचे हा निर्णय कोर्ट देउ शकत नाही. तुम्ही श्रीम. मोघे यांना कामावर घेणार परमनंन्ट करणार ठिक आहे. परंतु, त्या सफाई कामगारमध्ये मोडतात, त्याचे काय?

**केशव घरत :-**

श्रीम. मोघे यांना सफाई कामगार म्हणून कामावर घ्यायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

याचा अर्थ आपले वकिल तिकडे हजर नसणार. तिकडे आपले वकिल कमी पडलेले आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याकडे नगरपालिका असताना श्री. राउत मुख्याधिकारी होते.

**जयंत पाटील :-**

श्रीम. मोघे यांनी त्या लिपिक असल्याचे सांगितलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

५३८ कर्मचाऱ्यांच्याबाबतीत महापालिकेने जो ठराव केलेला आहे त्या ५३८ कर्मचाऱ्यांबाबत कोर्टातुन आदेश घेतलेला आहे का? ते महापालिकेचे कर्मचारी आहेत का?

**प्रभात पाटील :-**

५३८ कर्मचाऱ्यांना महापालिकेचे कर्मचारी असल्याचा शासनाने आदेश दिलेला आहे. तो शासन निर्णय आहे.

**मोहन पाटील :-**

५३८ कर्मचाऱ्यांना शासनाने आदेश दिलेला आहे.

**रतन पाटील :-**

एका ठिकाणी एक कायदा आणि दुसऱ्या ठिकाणी दुसरा कायदा असे का? ह्याच्यासाठी वेगळे नियम का? आपल्या महापालिकेतील कर्मचाऱ्यांची प्रकरणे कोर्टात प्रलंबित आहेत. आपण त्यांच्यासाठी वरच्या कोर्टात जातो हे योग्य आहे का? तुम्ही एकासाठी वेगळा कायदा आणि एकासाठी वेगळा कायदा असे का करता? तुम्ही समान कायदा का करित नाही.

**मिलन पाटील :-**

दि. २३/०३ च्या स्थायी समितीने या ठरावाला मंजुरी दिलेली आहे. त्याची अजुनपर्यंत अंमलबजावणी का झालेली नाही.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही कुठल्या ठरावाच्या अंमलबजावणी बाबत बोलत आहात.

**मिलन पाटील :-**

मी दि. २३/०३ रोजीच्या स्थायी समितीच्या ५३८ कर्मचाऱ्यांच्या ठरावाबाबत बोलतो.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी ५३८ कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जे काही जो काही मुद्दा सभागृहामध्ये उपस्थित केलेला आहे त्याचा आदर करून ५३८ कर्मचाऱ्यांची काय केस आहे. आपण जोपर्यंत त्याची कागदपत्रे बघत नाही तोपर्यंत आपल्याला काहीही सांगता येणार नाही. आपण सभागृहाच्या तीव्र भावना लक्षात घेता मी याबाबतीत एका आठवड्यामध्ये निणर्य देतो असे मी तुम्हाला सांगितलेले आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही त्यांना निकाल लागल्यापासुन पगार देणार आहात की निकालाच्या २४० दिवसापासुन पगार देणार अहात तेसुद्धा याठिकाणी सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

सफाई कामगार सन १९९३ मध्ये लागले आणि श्रीम. मोघे या सन १९९६ मध्ये लागल्या. त्या प्रथम लिपिक बनल्या आणि सन १९९३ मधिल सफाई कामगारसुद्धा लिपिक बनले.

**गजानन भोईर :-**

सफाई कामगारांना लिपिक बनवुन टाका.

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, पुर्वी जे काही सफाई कामगार परमनंन्ट केले त्या सगळ्यांना लिपिक बनवुन टाका.

**प्रेमनाथ पाटील :-**

सफाई कामगार सन १९९३ मध्ये लागलेले होते.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य तोच प्रश्न विचारतात आणि मी पुन्हा पुन्हा तेच उत्तर देत आहे. सर्व सन्मा. सदस्यांच्या भावना लक्षात घेता मला ५३८ कर्मचाऱ्यांच्याबाबतीत पेपर तपासु द्या. मी जोपर्यंत पेपर बघत नाही तोपर्यंत निर्णय घेउ शकत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

गोषवाऱ्यामध्ये स्पष्टपणे लिहले आहे.

**मा. आयुक्त :-**

मी या आठवडाभरात निर्णय घेतो असे या सभागृहात स्वतःहून सांगतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तो पर्यंत हा विषय पेंडींग ठेवा.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही हा विषय पेंडींग ठेवा.

**सुर्यकांत भोईर :-**

हा विषय पेंडींग ठेवा.

**केशव घरत :-**

हा विषय पेंडींग राहू द्या.

**रतन पाटील :-**

तुम्ही त्यांना निकाल लागल्यापासुन वेतनश्रेणी ठरविणार आहात की, निकालाप्रमाणे २४० दिवस पुर्ण झाल्यानंतरची वेतनश्रेणी ठरविणार आहात.

**मा. आयुक्त :-**

आपण निकालाच्या तारखेपासुन वेतनश्रेणी ठरवुया.

**गजानन भोईर :-**

साहेब, आपण यांची वेतनश्रेणी निकालाच्या तारखेपासून ठरविलेली आहे. परंतु, श्रीम. मोघे या लिपिक आहेत की सफाई कामगार आहेत याचा खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

श्रीम. मोघे या लिपिक आहेत.

**केशव घरत :-**

साहेब, तुम्ही असे कसे बोलता? तुम्ही असे रूलिंग दिले मग एका अर्थी तुम्ही ५३८ कामगारांवर अन्याय करित आहात हे स्पष्ट होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, तुम्ही असे कसे बोलता? सन १९९३ ला जे सफाई कामगार घेतले ते सन १९९६ मध्ये लिपिक झाले. सफाई कामगारचे लिपिक व्हायला तीन वर्षाचा फरक आहे.

**मा. आयुक्त :-**

मी सन्मा. सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर दिलेले आहे. आपण यांना जो वेतनाचा फरक देणार आहोत. आपण तो फरक कोर्टाच्या आदेशाप्रमाणे देउया.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही श्रीम. मोघे यांचा उल्लेख लिपिक असा केलेला आहे.

**केशव घरत :-**

तुम्ही श्रीम. मोघे यांना लिपिक म्हणून घेणार की सफाई कामगार म्हणून घेणार ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही श्रीम. मोघे यांना लिपिक म्हणून घेणार की सफाई कामगार म्हणून घेणार त्याचा खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

कोर्टाने श्रीम. मोघे यांना लिपिक म्हणून घेण्याचा आदेश दिला तर त्या आदेशाप्रमाणे लिपिक म्हणून घेणार.

**प्रेमनाथ पाटील :-**

जर तुम्ही श्रीम. मोघे यांना कोर्टाने दिलेल्या आदेशाप्रमाणे लिपिक म्हणून घेतले तर ५३८ कामगार कुठे जातील?

**केशव घरत :-**

५३८ कामगारांनीसुद्धा कोर्टात जायला पाहिजे जर ५३८ कामगार कोर्टात गेले तर तेसुद्धा लिपिक बनुन येतील.

**मा. आयुक्त :-**

तुमच्या ५३८ कामगारांच्या बाबतीतील तीव्र भावना लक्षात घेता मला प्रथम त्या कामगारांचे पेपर्स बघु दे. मी तुम्हाला हे तिसऱ्यावेळेला सांगत आहे. मला याबाबतीत सन्मा. सदस्यांनी आधी म्हणजे दहा पंधरा दिवस, महिन्यापुर्वी सांगितले असते तर मी स्वतःहून लक्ष दिले असते.

**प्रभात पाटील :-**

माझ्यामते तुम्ही ५३८ कामगारांचा निर्णय घेणार आहे. मी त्याबाबत असे सांगेन की, स्वातंत्र्यसैनिकांच्या मुलांची शैक्षणिक पात्रता कमी असताना शासनाने त्यांना काही सवलती दिलेल्या आहेत. जर स्वातंत्र्यसैनिकांच्या मुलांची शैक्षणिक पात्रता कमी असेल तरीसुद्धा ते लिपिक पदावर जाउ शकतात. आम्ही याबाबतीत मागच्या कमिशनर साहेबांकडे विषय काढलेला होता. परंतु, त्यांनी लक्ष घातले नव्हते. जर तुम्ही आठ दहा दिवसामध्ये हा निर्णय घेणार असाल तर मी आस्थापन विभागाला सांगेन की मा. आयुक्त साहेबांना स्वातंत्र्यसैनिकांची मुले निर्देशित करून द्या. मा. आयुक्त साहेबांना स्वातंत्र्यसैनिकांची मुले कोण आहेत? त्यांचे पाल्य कोण आहेत? ते समजु द्या.

**मा. आयुक्त :-**

मला स्वातंत्र्यसेनिकांच्या मुलांबाबत जी माहिती आहे ती मी तुम्हाला सांगतो की, स्वातंत्र्यसैनिकांच्या बाबतीत चर्चा करण्यासाठी माझ्याकडे सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आलेले होते आणि त्यांनी माझ्याकडे त्याबाबतीत सतत पाठपुरावा केलेला होता. ते जेव्हा जेव्हा माझ्याकडे आले आणि हा विषय काढला मी तेव्हा या सगळ्या फाईल मागविलेल्या होत्या. आपल्याकडून आपल्या स्तरावर कुठल्याही प्रकारचा निर्णय प्रलंबित नाही जो निर्णय प्रलंबित आहे तो वारसा हक्काचे दाखले देण्याबाबतचा प्रलंबित निर्णय आहे. वारसा हक्काचे दाखले देण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांचे आहेत. आपण अशा प्रकारचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवलेला आहे. आपल्याकडे त्यांच्याकडून वारसा हक्काचे प्रमाणपत्र आलेले नसल्यामुळे त्याच्यावर निर्णय झालेला नाही.

**प्रभात पाटील :-**

साहेब, स्वातंत्र्यसैनिकांच्या नातवंडाना वारसा हक्क देण्याबाबतचा जो कायदा आलेला आहे. तुम्ही त्याबाबत बोलत आहात. परंतु, मी त्याबाबत बोलत नाही. आपल्याकडे ऑलरेडी स्वातंत्र्यसैनिकांची मुले कार्यरत आहेत. जर त्यांची शैक्षणिक पात्रता कमी पडत असेल तर काय करायचे? तो मुद्दा मी तुम्हाला सांगत आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटील, जर तुमचा ५३८ कर्मचाऱ्यांबाबतचा प्रश्न प्रलंबित असेल तर या विषयाबरोबर ५३८ कर्मचाऱ्यांच्या विषयावर सुद्धा निर्णय घेतला जाईल.

**प्रभात पाटील :-**

मी ५३८ कर्मचाऱ्यांबद्दल बोलत आहे. मी नविन कर्मचाऱ्यांबद्दल बोलत नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, मी तुमच्या सुचनेशी संबंधित अजुन एक सुचना मांडतो की संबंधिताकडून शपथपत्र लिहुन घ्या. कारण उद्या आपण कोर्टाचा अवमान केला असे व्हायला नको. यासाठी माझे असे म्हणणे आहे की आपल्याला कोर्टाच्या निर्णयापासुन वेतन देण्यात येईल असे शपथ पत्र लिहून घ्या.

**केशव घरत :-**

मा. सभापती महोदय, माजी नगराध्यक्ष श्री. प्रफुल्ल पाटील यांनी प्रकल्पग्रस्त म्हणून काजुपाड्यांची सहा मुले घेतलेली होती. त्या मुलांनी जवळजवळ चार वर्षे काम केल्यानंतर आपल्या महापालिकेतर्फे त्यांची सेवा खंडीत करण्यात आलेली आहे. त्या मुलांनी पुढे काय करायचे?

**रतन पाटील :-**

आपल्या इथे काही प्रकल्पग्रस्त कुठून कुठून येउन लागलेले आहेत.

**केशव घरत :-**

आपल्या इथे प्रकल्पग्रस्त लागलेले आहेत. परंतु, ते प्रकल्पग्रस्त आपल्या एरीयामधुन लागलेले नाहीत.

**दिपक खांबित :-**

या प्रकल्पाबाबत शासन स्तरावर निर्णय होइल.

**रतन पाटील :-**

आपल्या इथे प्रकल्पग्रस्त लोक लागायला आपल्याकडे तसा प्रकल्प आहे की नाही ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

आता सन्मा. सदस्यांनी काजुपाडा येथील प्रकल्पग्रस्त मुलांचा प्रश्न विचारलेला आहे. मी याबाबत असा खुलासा करीन की या प्रकल्पग्रस्त मुलांची जी काही सेवा खंडीत केलेली आहे. ती सेवा का खंडीत केली? वगैरेबाबतची माहिती ५३८ कर्मचाऱ्यांच्या माहितीसोबत घेण्यात येईल.

**जयंत पाटील :-**

साहेब, स्थायी समिती सभा दि. २३/०३/२००४ रोजी आपला एक ठराव आलेला आहे. त्याच्यामध्ये ५३८ कर्मचाऱ्यांपैकी ९३ कर्मचाऱ्यांना लिपिक म्हणून बढती द्यावी असा ठराव झालेला आहे. त्यावेळेला सन्मा. सदस्य मोहन पाटील सभापती असण्याची शक्यता आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, क्लास ४ च्या कर्मचाऱ्यांना क्लास ३ मध्ये बढती द्यावी असे तुमचे म्हणणे आहे का?

**जयंत पाटील :-**

वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांना वर्ग ३ मध्ये अजुनपर्यंत घेण्याबाबतचा ठराव पास झालेला होता. परंतु, त्या कर्मचाऱ्यांना बढती दिलेली नाही.

**मा. आयुक्त :-**

मी याबाबतची सविस्तर माहिती उपलब्ध करून घेतो. तुम्ही कोर्टाच्या निकालाच्या दिनांक पासुन श्रीम. मोघे यांना वेतनश्रेणी द्यायची का?

**केशव घरत :-**

कोर्टाच्या निकालाप्रमाणे घ्या.

**जयंत पाटील :-**

साहेब, आपण जो आदेश वाचला. त्याबाबत मला सांगायचे आहे की आपण फक्त कोर्टाची ऑर्डर वाचलली आहे. त्याच्यामध्ये आपले वकिल काय बोलले? त्यांचे वकिल काय बोलले? हे समजणे आवश्यक आहे. श्रीम. मोघे यांनी कोर्टामध्ये लिपिक असल्याचे सांगितलेले आहे का? की सफाई कामगार होत्या ते आदेशामध्ये काहीही लिहलेले नाही.

**मा. आयुक्त :-**

आपण फक्त कोर्टाचा आदेश वाचलेला आहे का?

**जयंत पाटील :-**

आपण फक्त कोर्टाचा आदेश वाचलेला आहे.

**रतन पाटील :-**

आपल्या वकिलाने काहीही काम केलेले नाही.

**जयंत पाटील :-**

आपल्या वकिलाने झीरो काम केलेले आहे तरी आपण त्याला पैसे दिले असणार असे मला वाटते.

**मा. आयुक्त :-**

प्रत्येक कर्मचाऱ्याच्या बाबतीत तसेच होते.

(सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत भोईर ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**धृवकिशोर पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

या ठरावात संबंधितांचे शपथपत्र लिहून घेउन ही सुचना ॲड करा.

**प्रकरण क्र. १९७ :-**

श्रीम. रत्नप्रभा मोघे, यांना मा. औद्योगिक न्यायालय ठाणे यांचेकडील आदेशानुसार महानगरपालिका आस्थापनेवर कायम करणेस मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. २०४ :-**

महानगरपालिका आस्थापनेवर १९९६ पासून श्रीम. रत्नप्रभा मोघे, ह्या रोजंदारीवर कार्यरत होत्या. त्या रोजंदारीवर काम करीत असतांना त्यांचे सोबत अन्य कर्मचारी सुद्धा १९९६ मध्ये कार्यरत होते. परंतू त्या अन्य कर्मचाऱ्यांना शासनाने १९९३ रोजी जे प्रत्यक्ष रोजंदारीवर सेवेत होते. त्या कर्मचाऱ्यांना सफाई कामगार म्हणून १/६/२००० रोजी कायम केले. परंतू श्रीम. रत्नप्रभा मोघे या १९९६ मध्ये रोजंदारीवर लागलेल्या असल्यामुळे शासनाने कायम करते वेळी यांच्या नावाचा विचार केलेला नाही. त्यामुळे त्या रोजंदारीवरच कार्यरत राहिल्या. त्यानंतर त्यांनी रोजंदारीवर कार्यरत असतांना कायम करावे म्हणून मा. औद्योगिक न्यायालयात दावा (क्र. ८३/२००३) दाखल केला. सदर दाव्याचा निकाल दि. ८/११/२००५ रोजी लागून त्यांना 'लिपीक' या पदावर २४० दिवस पूर्ण सेवा झाल्याच्या दिनांकापासून कायम करावे असे आदेश दिलेले आहेत.

श्रीम. रत्नप्रभा मोघे यांना ''लिपीक'' पदावर रु. ३०५०-७५-३९५०-८०-४५९० या वेतनश्रेणीत मा. औद्योगिक न्यायालयाचे दि. ८/११/२००५ रोजीच्या निकालाचे अधिन राहून न्यायालयाच्या निकालाचे

दिनांकापासून महानगरपालिकेत सामावून घेणेस मान्यता देण्यांत येत असून येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय खर्चास मंजूरी देण्यांत येते. त्यांच्याकडून शपथपत्र घेण्यांत यावे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर. अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १९८ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. मोहन पाटील ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही यांच्यासाठी पाच महिन्याची मुदत द्यावी कारण श्री. प्रमोद पडवळ यांना सहा महिन्याची मुदत दिल तर परमनंन्ट होतील.

**गजानन भोईर :-**

मा. सभापती साहेब, हे सगळे श्री. अजीज शेखसाहेबांच्या अंडर राहू दे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. प्रमोद पडवळ नवीन असल्यामुळे त्यांनी फक्त रुग्णालय आणि दवाखान्यावर लक्ष द्यावे.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. १९८ चा ठराव मंजुर झाल्यामुळे पुढचा विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. १९८ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ अन्वये वैद्यकिय आरोग्य अधिकारी पदाबाबत.

**ठराव क्र. २०५ :-**

महापालिका हद्दीतील सार्वजनिक साफसफाई, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प कार्यान्वित करणे, बायोमेडीकल वेस्टची व्यवस्था करणे, दुर्धर रोग व साथीच्या आजारास प्रतिबंध करणे, त्याचा फैलाव होऊ नये यासाठी कार्यवाही करणे, बाजार कत्तलखाने यांचे परिक्षण व नियमन करणे, मांस विक्री दुकानाला परवानगी देणे, आरोग्यास अपायकारक वस्तूंची पाहणी करुन निर्णय घेणे, जन्म-मृत्यू नोंदी ठेवणे, महापालिका हद्दीतील कुटूंब कल्याण योजना, पल्स पोलिओ लसीकरण इत्यादी राष्ट्रीय कार्यक्रम आयोजित करणे, शासनाचे आरोगय विषयक कामकाज योजना कार्यान्वित करणे, तसेच सध्या महापालिकेचे स्वतःचे रुग्णालय अथवा आरोग्य केंद्र नाही, त्यासाठी जिल्हापरिषदेचे रुग्णालय ताब्यात घेण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करणे इत्यादी सर्व बाबी विचारात घेता महानगरपालिकेस वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांची आवश्यकता आहे. सदरच्या पदावर पूर्वी विशेष कार्य अधिकारी या नावाने डॉ. बावीस्कर हे कार्यरत होते. त्यांची मुदत संपल्यावर त्यांना कार्यमुक्त करण्यात आलेले ओ. तेव्हापासून पद रिक्त आहे.

शासन निर्णय क्र. M.B.M.C.-२००२/१७७३/प्र.क्र१६३/नवि-२५, दि. ३१/१०/२००२ अन्वये वैद्यकिय आरोग्य अधिकारी हे मंजूर पद शासनाजवळ मनपा/आस्था/१७७/२५३७/२००४-०५, दि. १६/९/२००४ नुसार प्रतिनियुक्तीने पाठविणेबाबत पत्रव्यवहार केलेला आहे. परंतू, अद्याप त्यांचेकडून प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे प्रतिनियुक्तीवर ''वैद्यकिय आरोग्य अधिकारी'' येईपर्यंत तात्पुरती उपाययोजना म्हणून व होणारी गैरसोय टाळण्याकरिता एक अनुभवी व शैक्षणिक पात्रता धारक वैद्यकिय आरोग्य अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी म्हणून तातडीची आवश्यकता लक्षात घेता जाहिर वृत्तपत्रात निविदा मागवून विलंब होणार असल्याने डॉ. प्रमोद व्ही. पडवळ, M.B.B.S. M.D. हे ठेका पद्धतीने मानधनावर काम करणेस तयार असल्याने त्यांना प्रतिमाह रु. २०,०००/- मानधनावर सहा महिन्यासाठी नियुक्ती करणेस मान्यता देण्यांत येत असून येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी आहे.

**सुचक :- श्री. मोहन म. पाटील. अनुमोदन :- श्री. गजानन भोईर.**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १९९ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. एस्. ए. खान ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

हा विषय मंजुर आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, प्रकरण क्र. १९९ च्या ठरावाबाबत मला बोलायचे आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रकरण क्र. १९९ चा ठराव पास झालेला आहे.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. १९९ चा ठराव पास झालेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रकरण क्र. १९९ चा ठराव पास झालेला असला तरी आमच्या त्या ठरावाबाबत काही सुचना आहेत. आम्ही या ठरावाला विरोध करित नाही.

**मा. सभापती :-**

या ठरावाला मंजुरी दिलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी या ठरावाला विरोध करित नाही. तुम्ही प्रथम माझे जरा ऐकुन घ्या. ह्या ठरावात संपुर्णपणे मिरा रोड आणि भाईंदर ईस्ट ला प्राधान्य दिलेले आहे. भाईंदर वेस्ट ला अजिबात प्राधान्य दिलेले नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण हा विषय पुढच्या बजेटमध्ये घेउ या.

**एस. ए. खान :-**

हा विषय पुढच्या वेळेला घेउया.

**रतन पाटील :-**

मागच्या वेळेला भाईंदर वेस्ट ला प्राधान्य दिलेले होते. भाईंदर वेस्टला एकही डि.पी रोड नाही.

**प्रकरण क्र. १९९ :-**

निविदांना मंजुरी देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. २०६ :-**

imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_It kravayaacyaa ivaivaQa ivakasa kamaaMcyaa jaahIr inaivada saucanaosausaar KalaIla kamaakrIta zokodaraMnaI maudtIt inaivada saadr kolaolyaa Aahot.

| A. Ë. | kamaacao naava zokodaracao naava | AMdaijat Kca- |
|---|---|---|
| 1 | C~ptI iSavajaI maharaja maagaa-varIla AlaKnaMda [maart to PlaoJaMT pak- pya-Mt rsta KDIkrNaÀDaMbarIkrNa krNao.<br>1´ mao.gaaopala AsaaoisaeT\sa<br>2´ mao.kMcana kMnsT/@Sana kMpnaI<br>3´ mao.isaQdI kMnsT/@Sana<br>4´ mao.sauvaNaa- enTrp`ayajaosa | $.13¸82¸769À¹<br><br>10.00‰ jaast dranao<br>2.88‰ jaast dranao<br>8.00‰ jaast dranao<br>5.00‰ jaast dranao |
| 2 | Baa[-Mdr³p.´ Da^.baabaasaahoba AaMbaoDkr maaga- ³60 fuTI raoD´ rs%yaavarIla Ëa^sa Do/na baaMQaNao.<br>1´ mao.Amaoya kMnsT/@Sana<br>2´ mao.kMcana kMnsT/@Sana kMpnaI<br>3´ mao.isaQdI kMnsT/@Sana<br>4´ mao.sauvaNaa- enTrp`ayajaosa | $.13¸79¸821À¹<br><br>10.00‰ jaast dranao<br>3.00‰ jaast dranao<br>11.00‰ jaast dranao |

| A.<br>Ë. | kamaacao naava zokodaracao naava | AMdaijat Kca- |
|---|---|---|
| | | 2.50‰ jaast dranao |
| 3 | Baa[-Mdr³p.´ maaMDlaI tlaava yaoqaIla A^Tlaok ha^Tola to 90 fuTI raoD rs%yaacyaa daonhI baajaUsa gaTar baaMQaNao.<br>1´ mao.yaSa enTrp`ayajaosa<br>2´ mao.sauroSa eca.r%tavaa<br>3´ mao.gajaanana kMnsT/@Sana<br>4´ mao.ema.esa. enTrp`ayajaosa | $.22¸03¸017À¹<br><br>10.00‰ jaast dranao<br>20.00‰ jaast dranao<br>15.00‰ jaast dranao<br>2.75‰ jaast dranao |
| 4 | Baa[-Mdr³pU.´ ]D\DaNapUla jaM@Sana ³gaaolDna naosT to KaDIpya-MMt´ to jaosalapak- rs%yaa<br>pya-Mtcaa rsta 30.00 maI. pya-Mt $Md k$na tyaar krNao¸ naalaa baaMQaNao.<br>1´ mao.saa[-d%t enTrp`ayajaosa<br>2´ mao.EaljaI kMnsT/@Sana ³sana 2004¹05 yaa vaYaa-cyaa ijalha dr saucaI nausaar´<br>³sana 2005¹06 yaa vaYaa-cyaa ijalha dr saucaI nausaar´<br>3´ mao.jyaaotI kMnsT/@Sana kMpnaI | $.6¸31¸79¸943 À¹<br><br>20.00‰ jaast dranao<br>16.00‰ jaast dranao<br>4.62‰ jaast dranao<br>25.00‰ jaast dranao |
| 5 | C~ptI iSavaajaI maharaja maaga- to knaakIyaa kDo jaaNaara 30.00 maI.$MdIcaa ]va-rIt DI.pI.raoD KaDIpya-Mt ³jaosala pak-GaaoDbaMdr rs%yaapya-Mt´ tyaar krNao krIta maatIBarava krNao¸ KDIkrNa DaMbarIkrNa krNao va gaTar baaMQaNao.<br>1´ mao.saa[-d%t enTrp`ayajaosa<br>2´ mao.EaljaI kMnsT/@Sana ³sana 2004¹05 yaa vaYaa-cyaa ijalha dr saucaI nausaar´<br>³sana 2005¹06 yaa vaYaa-cyaa ijalha dr saucaI nausaar´<br>3´ mao.jyaaotI kMnsT/@Sana kMpnaI | $.5¸90¸83¸451 À¹<br><br>20.00‰ jaast dranao<br>17.00‰ jaast dranao<br>4.42‰ jaast dranao<br>20.00‰ jaast dranao |
| 6 | hTkoSa ]Vaoga nagar yaoqaUna GaaoDbaMdr jaosalapak- rs%yaapya-Mt jaaNaara 30.00 maI. DI.pI. raoD tyaar krNao¸ gaTar baaMQaNao.<br>1´ mao.saa[-d%t enTrp`ayajaosa<br>2´ mao.EaljaI kMnsT/@Sana ³sana 2004¹05 yaa vaYaa-cyaa ijalha dr saucaI nausaar´<br>³sana 2005¹06 yaa vaYaa-cyaa ijalha dr saucaI nausaar´<br>3´ mao.jyaaotI kMnsT/@Sana kMpnaI | $.4¸91¸00¸943 À¹<br><br>22.00‰ jaast dranao<br>19.00‰ jaast dranao<br>4.29‰ jaast dranao<br>22.00‰ jaast dranao |

| A.<br>Ë. | kamaacao naava zokodaracao naava | AMdaijat Kca- |
|---|---|---|
| 7 | C~ptI iSavaajaI maharaja maaga- pasaUna PlaIJaMT pak- to imara gaaMva hayavaopya-Mt 30.00 maI.$MdIcaa DI.pI.raoD tyaar krNao¸ krIta maatIBarava krNao KDIkrNa¸ DaMbarIkrNa krNao va gaTar baaQaNao.<br>1´mao.saa[-d%t enTrp`ayajaosa ³sana 2004¹05 yaa vaYaa-cyaa ijalha dr saucaI nausaar´<br>³sana 2005¹06 yaa vaYaa-cyaa ijalha dr saucaI nausaar´<br>2´mao.EaIjaI kMnsT/@Sana<br>3´mao.jyaaotI kMnsT/@Sana kMpnaI | $.4¸72¸71¸396 À¹<br><br>22.00‰ jaast dranao<br>5.38‰ jaast dranao<br>25.00‰ jaast dranao<br>27.00‰ jaast dranao |
| 8 | caoNaa iba`ja to vaolakr kMpa}MD pya-Mt saMrxaNa iBaMt baaMQaNao<br>1´ mao.esa.eca.r%tavaa<br>**2´ mao.gajaanana kMnsT/@Sana**<br>3´ mao.ema.esa.enTrp`ayajaosa<br>4´ mao.A^naayaDa enTrp`ayajaosa | $.36¸82¸225À¹<br>20.00‰ jaast dranao<br>**3.30‰ jaast dranao**<br>15.50‰ jaast dranao<br>7.00‰ jaast dranao |
| 9 | C~ptI iSavaajaI maharaja maaga- rs%yaacyaa maQyaBaagaI duBaajakavar daonhI baajaUsa laaoKMDI rolaIMga basaivaNao.<br>mao.gau$jaI kMnsT/@Sana<br>**mao.gajaanana kMnsT/@Sana**<br>mao.saa[-d%t enTrp`ayajaosa | $.1¸35¸47¸289 À¹<br><br>5.00‰ jaast dranao<br>**3.00‰ jaast dranao**<br>6.50‰ jaast dranao |
| 10 | caoNaa yaoqaIla paTIlapaDa to vaolakr [sToT pya-Mt rs%yaalagat saMrxaNa iBaMt baaMQaNao<br>1´ mao.esa.eca.r%tavaa<br>**2´ mao.gajaanana kMnsT/@Sana**<br>3´ mao.ema.esa.enTrp`ayajaosa<br>4´ mao.A^naayaDa enTrp`ayajaosa | $.24¸51¸014À¹<br>18.00‰ jaast dranao<br>**3.20‰ jaast dranao**<br>13.50‰ jaast dranao<br>12.00‰ jaast dranao |
| ११ | भाईंदर (पूर्व) ज्योती पार्कच्या मागून गोडदेव स्मशान रोड पर्यत आर. सी. सी. नाला बांधणे.<br>mao.gau$jaI kMnsT/@Sana<br>mao.Aaoma kMnsT/@Sana<br>**mao.ekta kMnsT/@Sana**<br>mao.gajaanana kMnsT/@Sana | रु.३९,६९,५८७/-<br><br>7.00‰ jaast dranao<br>4.00‰ jaast dranao<br>**3.00‰ jaast** |

| A. Ë. | kamaacao naava zokodaracao naava | AMdaijat Kca- |
|---|---|---|
| | | **dranao**<br>5.00‰ jaast dranao |
| १२ | उत्तन धावगी येथे वेलंकनी क्रॉस पासून नियोजित धनकचरा प्रकल्पाकडे जाणा-या रस्त्याच्या दोन्ही बाजूस संरक्षक भिंत बांधणे.<br>mao.gau$jaI kMnsT/@Sana<br>mao.Aaoma kMnsT/@Sana<br>mao.ekta kMnsT/@Sana<br>**mao.gajaanana kMnsT/@Sana** | रु.३३,६३,३९८/-<br><br>8.00‰ jaast dranao<br>4.00‰ jaast dranao<br>5.00‰ jaast dranao<br>**3.00‰ jaast dranao** |
| १३ | Baa[-Mdr³p.´ ToMBaa Ëa^sa raoD saM%saga to smaSaanaBaUmaI pya-Mt ]va-rIt gaTar baaMQaNao<br>1´ mao.esa.eca.r%tavaa<br>2´ mao.gajaanana kMnsT/@Sana<br>**3´ mao.ema.esa.enTrp`ayajaosa**<br>4´ mao.A^naayaDa enTrp`ayajaosa | $.19¸29¸938À¹<br>11.00‰ jaast dranao<br>15.00‰ jaast dranao<br>**3.45‰ jaast dranao**<br>11.00‰ jaast dranao |
| १४ | उत्तन धावगी येथे वेलंकनी क्रॉस पासून नियोजित धनकचरा प्रकल्पाकडे जाणारा रस्ता बनविणे.<br>mao.gau$jaI kMnsT/@Sana<br>mao.Aaoma kMnsT/@Sana<br>mao.ekta kMnsT/@Sana<br>**mao.gajaanana kMnsT/@Sana** | रु. २९,६५,५२५/-<br><br>9.00‰ jaast dranao<br>7.00‰ jaast dranao<br>8.00‰ jaast dranao<br>**3.00‰ jaast dranao** |
| १५ | ra.ma.Ë.8 varIla p`Baaga Ë.11 maQaIla kaiSaimara paoilasa sToSana javaLIla smaSaanaBaUmaI AMtga-t Aar.saI.saI.,SaoD baaMQaNao<br>1´ mao.esa.eca.r%tavaa<br>2´ mao.gajaanana kMnsT/@Sana<br>**3´ mao.ema.esa.enTrp`ayajaosa**<br>4´ mao.A^naayaDa enTrp`ayajaosa | $.18¸85¸902À¹<br><br>16.00‰ jaast dranao<br>13.00‰ jaast dranao<br>**3.25‰ jaast dranao**<br>14.00‰ jaast dranao |
| १६ | भाईंदर (पूर्व) लोढा कॉम्पलेक्स परिसरातील डांबरी रस्ते व सी. सी. गटारे बांधणे<br>mao.gau$jaI kMnsT/@Sana<br>mao.Aaoma kMnsT/@Sana | रु. ३२,६३,१६४/-<br><br>8.00‰ jaast dranao |

| A. Ë. | kamaacao naava zokodaracao naava | AMdaijat Kca- |
|---|---|---|
| | **mao.ekta kMnsT/@Sana**<br>mao.gajaanana kMnsT/@Sana | 7.00‰ jaast dranao<br>**3.00‰ jaast dranao**<br>6.00‰ jaast dranao |
| १७ | ra^yala ka^laoja to imara AaOVaoigak vasaaht raYT/Iya mahamaaga- Ë.8 kDo jaaNaara rsta tyaar krNao. daonhI baajaUsa gaTar baaMQaNao.³30.00 maI.$Md´<br>1´mao.saa[-d%t enTrp`ayajaosa<br>2´mao.EaljaI kMnsT/@Sana ³sana 2004¹05 yaa vaYaa-cyaa ijalha dr saucaI nausaar´<br>³sana 2005¹06 yaa vaYaa-cyaa ijalha dr saucaI nausaar´<br>3´mao.jyaaotI kMnsT/@Sana kMpnaI | $.1¸93¸42¸951 À¹<br><br>23.00‰ jaast dranao<br>20.50‰ jaast dranao<br>4.33‰ jaast dranao<br>22.00‰ jaast dranao |
| १८ | Baa[-Mdr³pU.´ ]D\DaNapUla to nayaanagar kDo jaaNaara 30.00 maI DI.pI.raoD tyaar krNao va DIvhayaDr basaivaNao¸ gaTar baaMQaNao.<br>1´mao.saa[-d%t enTrp`ayajaosa ³sana 2004¹05 yaa vaYaa-cyaa ijalha dr saucaI nausaar´<br>³sana 2005¹06 yaa vaYaa-cyaa ijalha dr saucaI nausaar´<br>2´mao.EaljaI kMnsT/@Sana<br>3´mao.jyaaotI kMnsT/@Sana kMpnaI | $.2¸56¸54¸738 À¹<br><br>17.20‰ jaast dranao<br>4.44‰ jaast dranao<br>20.00‰ jaast dranao<br>21.00‰ jaast dranao |
| १९ | C~ptI iSavaajaI maharaja maaga- savho- Ë.479 to savho- Ë. 292 pya-Mt jaaNaara 18.00 maI. $MdIcaa DI.pI.rsta tyaar krNao¸ gaTar baaMQaNao.<br>1´mao.saa[-d%t enTrp`ayajaosa<br>2´mao.EaljaI kMnsT/@Sana ³sana 2004¹05 yaa vaYaa-cyaa ijalha dr saucaI nausaar´<br>³sana 2005¹06 yaa vaYaa-cyaa ijalha dr saucaI nausaar´<br>3´mao.jyaaotI kMnsT/@Sana kMpnaI | $.3¸00¸62¸564 À¹<br><br>20.00‰ jaast dranao<br>17.20‰ jaast dranao<br>4.73‰ jaast dranao<br>20.00‰ jaast dranao |
| २० | Baa[-Mdr³pU.´ paMcaaL nagar ga^sa gaaoDa}na to gaaolDna naosT DI.pI.raoD pya-Mt rsta tyaar krNao¸ gaTar baaMQaNao.<br>1´mao.saa[-d%t enTrp`ayajaosa ³sana 2004¹05 yaa vaYaa-cyaa ijalha dr saucaI nausaar´<br>³sana 2005¹06 yaa vaYaa-cyaa ijalha dr saucaI nausaar´ | $.55¸29¸750À¹<br><br>21.50‰ jaast dranao<br>4.67‰ jaast dranao<br>24.00‰ jaast |

| A. Ë. | kamaacao naava zokodaracao naava | AMdaijat Kca- |
|---|---|---|
| | 2´mao.EaljaI kMnsT/@Sana<br>3´mao.jyaaotI kMnsT/@Sana kMpnaI | dranao<br>25.00‰ jaast dranao |
| २१ | imararaoD isalvar pak- yaoqao AgnaISamana sqaanak va kma-caarI inavaasa sqaana baaMQaNao.<br>1´ mao.parsa kMnsT/@Sana<br>**2´ mao.gajaanana kMnsT/@Sana**<br>**दर वाटाघाटीनंतर**<br>3´ mao.mahadova kMnsT/@Sana kMpnaI<br>4´ mao.gau$jaI kMnsT/@Sana | $.52¸18¸093À1<br>22.00‰ jaast dranao<br>**20.00‰ jaast dranao**<br>**१५‰ जास्त दराने**<br>29.00‰ jaast dranao<br>28.00‰ jaast dranao |

वरील पैकी सर्वात कमी दराच्या निविदा हया वाजवी आहेत. तरी अ. क्र. ०१ च्या कामाकरीता मे. कंचन कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा २.८८ % जास्त दराची निविदा, अ. क्र. २ च्या कामाकरीता ठेकेदार मे. सुवर्णा एन्टरप्राईजेस यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा २.५० % जास्त दराची निविदा, अ.क्र. ३ च्या कामाकरीता ठेकेदार मे. एम. एस. एन्टरप्राईजेस यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा २.७५ % जास्त दराची निविदा, अ. क्र. ४ च्या कामाकरीता ठेकेदार मे. श्री जी कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा १६.०० % जास्त दराची निविदा, अं. क्र. ५ च्या कामाकरीता ठेकेदार मे. श्री जी कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा १७.०० % जास्त दराची निविदा, अं. क्र. ६ च्या कामाकरीता ठेकेदार मे. श्री जी कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा १९.०० % जास्त दराची निविदा, अ. क्र. ७ च्या कामाकरीता ठेकेदार मे. साईदत्त एन्टरप्राईजेस यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा २२.०० % जास्त दराची निविदा, अ. क्र. ८ च्या कामाकरीता ठेकेदार मे. गजानन कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ३.३० % जास्त दराची निविदा, अ.क्र. ९ च्या कामाकरीता ठेकेदार मे. गजानन कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ३.०० % जास्त दराची निविदा, अ. क्रं. १० च्या कामाकरीता ठेकेदार मे. गजानन कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ३.२० % जास्त दराची निविदा, अ. क्रं. ११ च्या कामाकरीता ठेकेदार मे. एकता कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ३.०० % जास्त दराची निविदा, अ. क्रं. १२ च्या कामाकरीता ठेकेदार मे. गजानन कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ३.०० % जास्त दराची निविदा, अ. क्रं. १३ च्या कामाकरीता ठेकेदार मे. एस. एम. एन्टरप्रायजेस यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ३.४५ % जास्त दराची निविदा, अ. क्रं. १४ च्या कामाकरीता ठेकेदार मे. गजानन कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ३.०० % जास्त दराची निविदा, अ. क्रं. १५ च्या कामाकरीता ठेकेदार मे. एस. एम. एन्टरप्रायजेस यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ३.२५ % जास्त दराची निविदा, अ. क्रं. १६ च्या कामाकरीता ठेकेदार मे. एकता कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ३.०० % जास्त दराची निविदा, अ. क्रं. १७ च्या कामाकरीता ठेकेदार मे. श्री जी कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा २०.५० % जास्त दराची निविदा, अ. क्रं. १८ च्या कामाकरीता ठेकेदार मे. साईदत्त एन्टरप्रायजेस यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा १७.२० % जास्त दराची निविदा, अ. क्रं. १९ च्या कामाकरीता ठेकेदार मे. श्री जी कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा १७.२० % जास्त दराची निविदा, अ. क्रं. २० च्या कामाकरीता ठेकेदार मे. साईदत्त एन्टरप्रायजेस यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा २१.५० % जास्त दराची निविदा, अ.क्रं. २१ च्या कामाकरीता ठेकेदार मे. गजानन कन्स्ट्रक्शन यांची दर वाटाघाटीनंतर १५.००% जास्त दराची निविदा हि वाजवी असुन सदर अ.क्रं. १ ते २१ कामांच्या निविदांना मुंबई प्रांतिक महनगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मंजूरी देण्यात येत आहे. सदर कामे प्रशासनामार्फत टेंडर फॉर्म व करारनाम्यातील अटीशर्तीनुसार पार पाडण्यात यावीत व प्रशासनास पुढील सर्व कार्यवाहीचे अधिकार देण्यात येत आहेत. तसेच ठेकेदारांची वेळोवेळी येणा-या देयकांच्या प्रदानास मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. एस्. ए. खान.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २०० चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. २०० :-**

निविदांना मंजुरी देणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. २०७ :-**

दि. १९/१२/२००५ रोजीच्या **दै. सकाळ** या वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार **(निविदा सुचना क्र. १७/२००५-०६) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात खालील ठिकाणी जलवाहिनी अंथरणेच्या कामाकरिता** निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदर निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१) सिनेप्राईम ते न्यु गोल्डन नेस्टपर्यंत बिडाची जलवाहिनी अंथरणे.

(अंदाजित रक्कम - रु. १६,७१,००६/-)

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| मे. एस. एन. इंटरप्रायजेस | १.९९% ज्यादा दराने |
| मे. संदेश डी. बुटाला | ३.२५% ज्यादा दराने |
| मे. ॲकॉर्ड मार्केटिंग ॲन्ड सर्विसेस | ४.५०% ज्यादा दराने |

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता **मे. एस. एन. इंटरप्रायजेस** यांनी सादर केलेली निविदा लघुत्तम असून दर वाजवी व रास्त आहेत. सबब वरील कामाकरीता **मे. एस. एन. इंटरप्रायजेस** यांची निविदा मंजूर करणेस व याकामी वेळोवेळी येणारी देयके प्रदान करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २०१ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. २०१ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. २०८ :-**

**अ) दिनांक ०९/१२/२००५ च्या दैनिक सकाळ या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या उपरोक्त जाहीर निविदा सुचनेनुसार** (निविदा सुचना क्र. १६ (२००५-०६)) मिरा रोड सोनाली हॉटेल रोडवरील गटारे नाले बांधकामात येणाऱ्या जलवाहिन्या स्थलांतरीत करणे **कामाकरीता निविदा प्राप्त झालेल्या आहेत.**

(अंदाजित रक्कम - रु. १,८७,०००/-)

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| **१) मे. एस. एन. इंटरप्रायजेस** | **१.७०% ज्यादा दराने** |
| **२) मे. संदेश डी. बुटाला** | **६.००% ज्यादा दराने** |
| **३) मेय योप्राम कंस्ट्रक्शन** | **५.६०% ज्यादा दराने** |

उपरोक्त निविंदापैकी **मे. एस. एन. इंटरप्रायजेस** यांची **१.७०%** ज्यादा दराची निविदा लघुत्तम असल्याने व सादर केलेले दर वाजवी व रास्त असल्याने त्यांची निविदा मंजूर केलेली आहे.

**ब)** दि. १९/१२/२००५ रोजीच्या **दै. सकाळ** या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यांत आलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार **(निविदा सुचना क्र. १७/२००५-०६) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात खालील ठिकाणी जलवाहिनी अंथरणेच्या कामाकरिता** निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

१) **मिरा रोड येथील गटारे नाले बांधकामात येणा-या जलवाहिन्या स्थलांतरीत करणे.**
(अंदाजित रक्कम - रु. ९,२७,६१७/-)

| **ठेकेदाराचे नांव** | **देकार** |
|---|---|
| **मे. एस. एन. इंटरप्रायजेस** | **४.९५% ज्यादा दराने (वाटाघाटीअंती ३% ज्यादा दराने )** |
| **मे. संदेश डी. बुटाला** | **५.५०% ज्यादा दराने** |
| **मे. ॲकॉर्ड मार्केटिंग ॲन्ड सर्विसेस** | **५.९०% ज्यादा दराने** |

---

२) **गोडदेव टाकी बायपासकरीता पोलादी जलवाहिनी अंथरणे.**
(अंदाजित रक्कम - रु. ४,१३,८८०/-)

| **ठेकेदाराचे नांव** | **देकार** |
|---|---|
| **मे. एस. एन. इंटरप्रायजेस** | **१.९८% ज्यादा दराने** |
| **मे. संदेश डी. बुटाला** | **३.००% ज्यादा दराने** |
| **मे. ॲकॉर्ड मार्केटिंग ॲन्ड सर्विसेस** | **४.३०% ज्यादा दराने** |

---

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता वरील दोन्ही कामांतकरीता **मे. एस. एन. इंटरप्रायजेस** यांची निविदा **लघुत्तम** असल्याने व सादर केलेले दर वाजवी व रास्त असल्याने त्यांची निविदा मंजूर केलेली आहे.

क)

| **कामाचे नाव** | **ठेकेदाराचे नाव** | **अंदाजित रक्कम** | **मंजूर दर** |
|---|---|---|---|
| सी. आय. (मॅकेनिकल फिटिंग व जॉईंटस) आय. एस. नं. १३३८२-१९९२ आणि समकक्ष आय.एस.ओ./बी.एस. स्टॅंडर्ड प्रमाणे पुरवठा करणे. | मे. केशरी ॲन्ड कं. | रु. ९,४२,२००/- | अंदाजित दराने |

सबब उपरोक्त प्रस्तांवाचे मा. स्थायी समिती सभेने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २०२ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेबांचा अवलोकनाचा विषय मंजुर झालेला आहे.

**जयंत पाटील :-**

आमच्याकडून जास्तीत जास्त टॅक्स येतो.

**प्रकरण क्र. २०२ :-**

मा. आयुक्त सोा. यांनी मंजूर केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. २०९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ ७९ चौ. कि.मी. आहे. महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर विकासाची कामे सुरु असल्यामुळे विकासकर्ते आपल्या जमिनीमध्ये मातीचे भराव टाकत आहेत. त्या भरावामुळे सखल भागात सांडपाण्याची डबकी, तळे तयार झाली आहेत. सदर डबक्यात साठलेल्या पाण्यात डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर वाढत असते.

सध्या हिवाळा ऋतु सुरु असल्याने डासांच्या उत्पत्तीसाठी पोषक वातावरण असल्याने शहरात या ऋतु मध्ये मोठ्या प्रमाणावर डास उत्पत्ती होत असते. सदर डासांची निर्मुलन करणे कामी मलेरिया ऑईल हे अळी नाशक औषधे बाजारात स्वस्त असल्याने मोठ्या प्रमाणावर शहरातील डबकी, नाले, गटारे, इमारतीचे सेफ्टीक टॅंक इत्यादी मोठ्या प्रमाणात फवारणी करुन डासांवर नियंत्रण करणे शक्य होईल. या करीता मे. इंडियन कॉर्पोरेशन (भारत सरकार प्राधिकृत) कडून थेट खरेदी केले आहे.

मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशनने एम.एल.ओ. विक्री करणे कामी कोणताही अधिकृत विक्रेता अथवा एजंट नेमलेला नसल्यामुळे, एम.एल.ओ. खरी कामी इंडियन ऑईल कंपनी यांचेकडून दर पत्रक मागवून

दरपत्रकानुसार प्रती १००० लिटर एम.एल.ओ. साठी रु. ३५,८८८.६१ पैसे असा दर आहे. त्यानुसार महापालिकेसाठी २०००० लिटर एम.एल.ओ. खरेदी कामी खालीलप्रमाणे खर्च आला आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | २०,००० लिटर एम.एल.ओ. खरेदी करणे | रु. ७,१७,७७२/- |
| २ | डि.डि. तयार करणेस लागणारा बँक कमिशन | रु. १,७९५/- |
| ३ | जकात कर | रु. १०,७६६/- |
| ४ | वाहतुक खर्च (इंडियन ऑईल ते मिरा भाईंदर) | रु. ८,०००/- |

२०००० लिटर मलेरिया ऑईल खरेदी करण्यासाठी रु. ७,३८,३३३/- खर्च झाला असून मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग अपणा सर्वांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्याबद्दल सर्वांचे आभार मानुन सभा संपल्याचे मी जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ०६.३० वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**